कर्नाटक सरकार

## सार्वजनिक शिक्षण इलाखा

# कलिका चेतरिके

## 2022-23

# शिक्षक मार्गदर्शिका

## विषय- समाज विज्ञान

## इयत्ता- 7 वी

समग्र शिक्षण कर्नाटक ,बेंगळूरु

आणि

राज्य शिक्षण संशोधन आणि प्रशिक्षण विभाग, बेंगळूरु

## ಸಂದೇಶ



ಆತ್ಮೀಯರೇ,

ಮಕ್ಕಳ ಶಿಕ್ಷಣವೇ ಭಾರತದ ಭವಿಷ್ಯ. ಇದಕ್ಕಾಗಿ ಕೇಂದ್ರ ಸರ್ಕಾರವು ಹೊಸ ಶಿಕ್ಷಣ ನೀತಿಯನ್ನು 2020ರಲ್ಲಿ ಜಾರಿಗೊಳಿಸಿದೆ. ಈ ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಶಿಕ್ಷಣ ನೀತಿ 2020 ರ ಶಿಫಾರಸ್ಸುಗಳನ್ನು ಅನುಷ್ಠಾನಗೊಳಿಸುವ ನಿಟ್ಟಿನಲ್ಲಿ ಕರ್ನಾಟಕ ರಾಜ್ಯ ಮುಂಚೂಣಿಯಲ್ಲಿದ್ದು, ವ್ಯವಸ್ಥೆಯಲ್ಲಿ ಸಾಕಷ್ಟು ಸುಧಾರಣೆಗಳನ್ನು ತರಲಾಗುತ್ತಿದೆ. ಪಠ್ಯಕ್ರಮ ವಿನ್ಯಾಸ, ಕಲಿಸುವಿಕೆಯಲ್ಲಿ ನಾವೀನ್ಯತೆ, ತರಗತಿ ಪ್ರಕ್ರಿಯೆಯ ಮರುವಿನ್ಯಾಸ ಹಾಗೂ ಶಾಲೆಗಳಲ್ಲಿ ಕಲಿಕಾ ಸಮೃದ್ಧ ವಾತಾವರಣ ನಿರ್ಮಾಣ ಮಾಡಲು ಹಲವು ಕಾರ್ಯತಂತ್ರಗಳನ್ನು ರೂಪಿಸಲಾಗುತ್ತಿದೆ. ಈಗಾಗಲೇ ನಿಪುಣ್ ಭಾರತ್ ಮಿಷನ್, ಬುನಾದಿ ಸಾಕ್ಷರತೆ ಮತ್ತು ಸಂಖ್ಯಾ ಜ್ಞಾನ ಕೌಶಲಗಳನ್ನು ಖಾತ್ರಿಪಡಿಸುವಲ್ಲಿ ಕಾರ್ಯಪ್ರವೃತ್ತಗೊಂಡಿದೆ.

ಪ್ರಸ್ತುತ ಕೋವಿಡ್–19 ಸಾಂಕ್ರಾಮಿಕ ರೋಗದಿಂದಾಗಿ ಮಕ್ಕಳು ಔಪಚಾರಿಕ ಶಿಕ್ಷಣ ಪಡೆಯುವಲ್ಲಿ ಅಡೆತಡೆಗಳಾಗಿ, ಎರಡು ವರ್ಷಗಳಲ್ಲಿ ಕಲಿಕಾ ನಷ್ಟವಾಗಿರುತ್ತದೆ. ಔಪಚಾರಿಕ ಹಾಗೂ ಅನೌಪಚಾರಿಕ ಕಾರ್ಯತಂತ್ರಗಳ ಮೂಲಕ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳ ಕಲಿಕೆಯ ನಿರಂತರತೆಗೆ ಪ್ರಯತ್ನಿಸಿದ್ದಾಗ್ಯೂ ಸಹ ನಿರೀಕ್ಷಿತ ಮಟ್ಟದ ಕಲಿಕೆ ಆಗದಿರುವುದನ್ನು ಹಲವು ಅಧ್ಯಯನಗಳು ತಿಳಿಸಿವೆ. ಈ ಕಲಿಕಾ ಅಂತರವನ್ನು ಸರಿಪಡಿಸುವ ನಿಟ್ಟಿನಲ್ಲಿ ನಾವೆಲ್ಲರೂ ಕಾರ್ಯಪ್ರವೃತ್ತರಾಗಬೇಕಿದೆ. ಸದರಿ ಕಲಿಕಾ ಅಂತರವನ್ನು ಸರಿಪಡಿಸುವ ನಿಟ್ಟಿನಲ್ಲಿ ವೈಜ್ಞಾನಿಕ ತಳಹದಿಯ ಮೇಲೆ ಕರ್ನಾಟಕ ಸರ್ಕಾರ **'ಕಲಿಕಾ ಚೇತರಿಕೆ'** ಎಂಬ ವಿನೂತನ ಕಾರ್ಯಕ್ರಮವನ್ನು 2022–23ನೇ ಶೈಕ್ಷಣಿಕ ವರ್ಷದಲ್ಲಿ ಅನುಷ್ಠಾನಗೊಳಿಸುತ್ತಿದೆ.

ಎಲ್ಲಾ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳು ಹಿಂದಿನ ಎರಡು ತರಗತಿಗಳಲ್ಲಿ ಕಲಿಯಲೇ ಬೇಕಾಗಿದ್ದ ಪ್ರಮುಖ ಸಾಮರ್ಥ್ಯ, ಪರಿಕಲ್ಪನೆಗಳನ್ನು ಗುರುತಿಸಿದೆ. ಇದಕ್ಕೆ ಸಂವಾದಿಯಾಗಿ ಪ್ರಸಕ್ತ ತರಗತಿಯಲ್ಲಿ ಕಲಿಯಲೇಬೇಕಾದ ಪ್ರಮುಖ ಸಾಮರ್ಥ್ಯ, ಪರಿಕಲ್ಪನೆಗಳನ್ನು ಜೋಡಿಸಿ ಕಲಿಕಾ ಹಾಳೆಗಳನ್ನು ಮತ್ತು ಶಿಕ್ಷಕರ ಕೈಪಿಡಿಯನ್ನು ಸಿದ್ಧಪಡಿಸಲಾಗಿದೆ. ಕಲಿಕಾ ಹಾಳೆಗಳು ಚಟುವಟಿಕೆಗಳಿಂದ ಕೂಡಿದ್ದು, ಮಗುವಿನ ಮುಗ್ಧ ಮನಸ್ಸಿಗೆ ಸಂತೋಷವನ್ನುಂಟು ಮಾಡುವಂತೆ ರೂಪಿಸಲಾಗಿರುತ್ತದೆ. ಇವುಗಳನ್ನು ಪೂರ್ಣಗೊಳಿಸುವುದರಿಂದ ಹಾಲಿ ಕಲಿಕಾ ನಷ್ಟವನ್ನು ಸರಿದೂಗಿಸಬಹುದು ಎಂಬ ಆಶಯ ನನ್ನದಾಗಿರುತ್ತದೆ. ಕಲಿಕಾ ಹಾಳೆ, ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಮತ್ತು ಶಿಕ್ಷಕರ ಕೈಪಿಡಿಗಳು ಪರಸ್ಪರ ಪೂರಕವಾಗಿವೆ. ಶಿಕ್ಷಕರು ತಮ್ಮ ಕೈಪಿಡಿಯಲ್ಲಿ ನೀಡಿದ ಮಾರ್ಗಸೂಚಿಯನ್ವಯ ಈ ವಿನೂತನ ಕಾರ್ಯವನ್ನು ಅದರ ಅಂತಸ್ಸತ್ವದಿಂದ ಅನುಷ್ಠಾನಗೊಳಿಸಿ, ಮಕ್ಕಳ ಕಲಿಕೆಯ ಸುಧಾರಣೆಗೆ ಕಾರಣವಾಗುತ್ತೀರಿ ಎಂದು ಹಾರೈಸುತ್ತೇನೆ. ಆದ್ದರಿಂದ ಇಲಾಖೆಯ ಸರ್ವರೂ, ಪೋಷಕವರ್ಗ ಮತ್ತು ಭಾಗೀದಾರರೆಲ್ಲರೂ ಇದರಲ್ಲಿ ಪರಿಣಾಮಕಾರಿಯಾಗಿ ಕೈ ಜೋಡಿಸಿ ಈ ಕಾರ್ಯಕ್ರಮವನ್ನು ಯಶಸ್ವಿಗೊಳಿಸುತ್ತೀರೆಂದು ಆಶಿಸುತ್ತೇನೆ.

ಎಲ್ಲರಿಗೂ ಶುಭವಾಗಲಿ............

**ಶ್ರೀ ಬಿ.ಸಿ.ನಾಗೇಶ್,**
**ಸನ್ಮಾನ್ಯ ಶಿಕ್ಷಣ ಸಚಿವರು,**
**ಪ್ರಾಥಮಿಕ ಮತ್ತು ಪ್ರೌಢ ಶಿಕ್ಷಣ ಇಲಾಖೆ, ಕರ್ನಾಟಕ ಸರ್ಕಾರ**

## ಮುನ್ನುಡಿ



ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಶಿಕ್ಷಣ ನೀತಿ –2020ರ ಆಶಯದಂತೆ ಮಕ್ಕಳ ಕಲಿಕೆ ಮತ್ತು ಅಭಿವೃದ್ಧಿ ನಮ್ಮೆಲ್ಲರ ಜವಾಬ್ದಾರಿ. ಆದರೆ ಕೋವಿಡ್–19 ಸಾಂಕ್ರಾಮಿಕ ವಿಪತ್ತಿನಿಂದ ಮಕ್ಕಳ ಕಲಿಕೆಯಲ್ಲಿ ವ್ಯತ್ಯಯವಾಗಿ ಕಲಿಕಾ ನಿರಂತರತೆಯನ್ನು ಕಾಪಾಡಿಕೊಳ್ಳಲು ಕಳೆದೆರಡು ವರ್ಷಗಳಿಂದ ಸಾಧ್ಯವಾಗಿರುವುದಿಲ್ಲ. ಸಾಕಷ್ಟು ಕಲಿಕಾ ಅಂತರವಾಗಿರುತ್ತದೆ. ಈ ಅಂತರವನ್ನು ನೀಗಿಸಲು 2022–23ನೇ ಸಾಲಿನಲ್ಲಿ ಕಲಿಕಾ ಚೇತರಿಕೆ ಎಂಬ ವಿನೂತನ ಕಾರ್ಯಕ್ರಮವನ್ನು ಅನುಷ್ಠಾನಗೊಳಿಸಲಾಗುತ್ತಿದೆ.

ಈ ಕಾರ್ಯಕ್ರಮದ ಮೂಲಕ ಎಲ್ಲಾ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳಿಗೆ ಬುನಾದಿ ಸಾಕ್ಷರತೆ, ಸಂಖ್ಯಾ ಜ್ಞಾನಕ್ಕೆ ಒತ್ತು ನೀಡಲಾಗುವುದು ಹಾಗೂ ಮಗು ತನ್ನ ಹಿಂದಿನ ತರಗತಿಗಳಲ್ಲಿ ಅತ್ಯಗತ್ಯವಾಗಿ ಗಳಿಸಲೇಬೇಕಿದ್ದ ಕಲಿಕಾ ಫಲಗಳು ಹಾಗೂ ಪ್ರಸಕ್ತ ತರಗತಿಯಲ್ಲಿ ಕಲಿಯಲೇ ಬೇಕಾದ **"ಅತಿ ಮುಖ್ಯ ಕಲಿಕಾ ಫಲ"** ಗಳನ್ನು ಗುರುತಿಸಿ, ಚಟುವಟಿಕೆ ರೂಪಿಸಿ ಕಲಿಕಾ ಹಾಳೆಗಳನ್ನು ಮತ್ತು ಶಿಕ್ಷಕರ ಕೈಪಿಡಿಯನ್ನು ರೂಪಿಸಲಾಗಿದೆ. ಇವುಗಳಲ್ಲಿ **'ನಿಪುಣ್ ಭಾರತ್', 'ವಿದ್ಯಾಪ್ರವೇಶ್'ನಂತಹ ಉಪಕ್ರಮಗಳನ್ನು ಅಂತರ್ಗತಗೊಳಿಸಲಾಗಿದೆ.** ಈ ಚಟುವಟಿಕೆಗಳು ಶಿಶುಕೇಂದ್ರಿತ, ಕಲಿಕಾ ಹಾಗೂ ಶಿಕ್ಷಕ ಸ್ನೇಹಿಯಾಗಿವೆ. ಚಟುವಟಿಕಾ ಹಾಳೆಗಳ ಜೊತೆಗೆ, ಶಿಕ್ಷಕರಿಗೆ ಅಗತ್ಯ ಮಾರ್ಗದರ್ಶನ ನೀಡುವ 'ಶಿಕ್ಷಕರ ಕೈಪಿಡಿ'ಯನ್ನೂ ಸಿದ್ಧಪಡಿಸಿ ನೀಡಲಾಗುತ್ತಿದೆ. ಇವುಗಳನ್ನು ಬಳಸಿ ಮಕ್ಕಳ ಕಲಿಕಾ ಅಂತರ ಸರಿದೂಗಿಸುವ ಕಾರ್ಯವನ್ನು ತಾವೆಲ್ಲರೂ ಜವಾಬ್ದಾರಿಯಿಂದ ನಿರ್ವಹಿಸುತ್ತೀರೆಂಬ ಆಶಯವನ್ನು ಹೊಂದಿರುತ್ತೇನೆ. ಈ ಕಾರ್ಯದಲ್ಲಿ ತೊಡಗಿಸಿಕೊಂಡ ತಮಗೂ ಮತ್ತು ಅಜೀಂ ಪ್ರೇಮ್ ಜೀ ಫೌಂಡೇಶನ್ ಸಂಸ್ಥೆಗೂ ಇಲಾಖೆಯ ಪರವಾಗಿ ಅಭಿನಂದನೆಗಳು.

**ಡಾ. ಎಸ್, ಸೆಲ್ವಕುಮಾರ್ ಭಾ.ಆ.ಸೇ.**
**ಪ್ರಧಾನ ಕಾರ್ಯದರ್ಶಿಗಳು,**
**ಪ್ರಾಥಮಿಕ ಮತ್ತು ಪ್ರೌಢಶಿಕ್ಷಣ ಇಲಾಖೆ**

## ಆಶಯ ನುಡಿ



ವಿದ್ಯಾರ್ಥಿಯ ಶೈಕ್ಷಣಿಕ ಬದುಕಿನಲ್ಲಿ ಪ್ರತೀ ನಿತ್ಯವೂ ಕಲಿಕಾ ನಿರಂತರತೆ ಅತ್ಯಗತ್ಯ. ಆದರೆ ಕೋವಿಡ್–19 ಸಾಂಕ್ರಾಮಿಕದಿಂದಾಗಿ ಜಾಗತಿಕವಾಗಿ ಕಲಿಕಾ ನಿರಂತರತೆಗೆ ವ್ಯತ್ಯಯ ಉಂಟಾಗಿ ಮಕ್ಕಳಲ್ಲಿ ಕಲಿಕಾ ನಷ್ಟವಾಗಿರುವುದು ವೇದ್ಯ. ಇದನ್ನು ಸರಿದೂಗಿಸುವುದು ನಮ್ಮ ಆದ್ಯ ಕರ್ತವ್ಯವಾಗಿದೆ. ನಮ್ಮ ರಾಜ್ಯದಲ್ಲಿ ಕೋವಿಡ್–19 ನಿಂದಾಗಿ ಶಾಲೆಗಳು ಮುಚ್ಚಲ್ಪಟ್ಟಾಗ ವಿದ್ಯಾಗಮ, ಸಂವೇದ, ವಿಶೇಷ ಸೇತುಬಂಧ ಮುಂತಾದ ಪರ್ಯಾಯ ಕಾರ್ಯಕ್ರಮಗಳನ್ನು ರೂಪಿಸಿದರೂ ಮುಖಾಮುಖಿ ತರಗತಿ ಪ್ರಕ್ರಿಯೆಗೆ ಇವೆಲ್ಲಾ ಸಮಾಂತರವಾಗುವುದಿಲ್ಲ. ಪ್ರಸ್ತುತ **ಕಲಿಕಾ ಚೇತರಿಕೆ** ಕಾರ್ಯಕ್ರಮವು ವೈಜ್ಞಾನಿಕ ತಳಹದಿಯ ಮೇಲೆ ಶಿಶು ಕೇಂದ್ರಿತ ಚಟುವಟಿಕೆಗಳನ್ನು ರೂಪಿಸಿ ಕಲಿಕಾ ಹಾಳೆಗಳನ್ನು ನೀಡುತ್ತಿರುವ ವಿನೂತನ ಪ್ರಯತ್ನ. ಸರಿಸುಮಾರು ಎರಡು ವರ್ಷಗಳ ಶೈಕ್ಷಣಿಕ ಪ್ರಕ್ರಿಯೆಗಳು ಪೂರ್ಣವಾಗಿ ನಡೆಯದೇ, ಮಕ್ಕಳಲ್ಲಿ ಉಂಟಾಗಿರುವ ಕಲಿಕಾ ಅಂತರವನ್ನು ಸರಿದೂಗಿಸುವ ಸಲುವಾಗಿಯೇ ರೂಪಿಸಿದ ಉಪಕ್ರಮ. ಈ ಕಾರ್ಯವನ್ನು ಒಂದು ವರ್ಷದವರೆಗೆ ರಾಜ್ಯದಾದ್ಯಂತ ಅನುಷ್ಠಾನಗೊಳಿಸಿ ಮಕ್ಕಳ ಕಲಿಕಾ ನಷ್ಟವನ್ನು ತಾವೆಲ್ಲರೂ ತುಂಬಿಕೊಡುತ್ತೀರಿ ಎಂದು ಆಶಿಸುತ್ತೇನೆ. ಕಾರ್ಯಕ್ರಮದ ಪರಿಣಾಮಕಾರಿ ಅನುಷ್ಠಾನಕ್ಕಾಗಿ ಎಲ್ಲಾ ಭಾಗೀದಾರರು ಸಕ್ರಿಯವಾಗಿ ತೊಡಗಿಸಿಕೊಳ್ಳುವಿರೆಂದು ನಂಬಿದ್ದೇನೆ.

**ಡಾ. ವಿಶಾಲ್ ಆರ್, ಭಾ.ಆ.ಸೇ.**
**ಆಯುಕ್ತರು,**
**ಸಾರ್ವಜನಿಕ ಶಿಕ್ಷಣ ಇಲಾಖೆ, ಬೆಂಗಳೂರು**

## ಆರಂಭಿಕ ನುಡಿ



ಆತ್ಮೀಯರೇ,

ಹಿಂದಿನ ಎರಡು ವರ್ಷಗಳ ಕಾಲ ಕೋವಿಡ್–19ರ ಕಾರಣದಿಂದ ಔಪಚಾರಿಕ ತರಗತಿಗಳು ನಿರೀಕ್ಷೆಯಂತೆ ನಡೆಯದೇ ಮಕ್ಕಳಲ್ಲಿ ಕಲಿಕಾ ನಷ್ಟವುಂಟಾಗಿರುವುದು ಶೋಚನೀಯ. ಇದರಿಂದಾಗಿ ಕಲಿಕಾ ಅಂತರ, ಸಾಮಾಜಿಕ ಹಾಗೂ ಭಾವನಾತ್ಮಕ ಏರುಪೇರುಗಳೂ ಉಂಟಾಗಿವೆ. ಈ ಎಲ್ಲ ಅಡೆತಡೆಗಳನ್ನು ನಿವಾರಿಸಿ, ಕಲಿಕಾ ನಿರಂತರತೆಯನ್ನು ಕಾಯ್ದುಕೊಳ್ಳಲು 2022–23ನೇ ಶೈಕ್ಷಣಿಕ ವರ್ಷದಲ್ಲಿ **ಕಲಿಕಾ ಚೇತರಿಕೆ ಕಾರ್ಯಕ್ರಮವನ್ನು** ಅನುಷ್ಠಾನಗೊಳಿಸಲಾಗುತ್ತಿದೆ. ಪ್ರತಿಯೊಬ್ಬ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಯು ಬುನಾದಿ ಸಾಕ್ಷರತೆ ಮತ್ತು ಸಂಖ್ಯಾಜ್ಞಾನವನ್ನು ಸಾಧಿಸುವುದು ಪ್ರಥಮ ಆದ್ಯತೆಯಾಗಿರುತ್ತದೆ. ಎಲ್ಲಾ ಕಲಿಕೆಗೆ ಮೂಲಭೂತವಾಗಿ ಬುನಾದಿ ಸಾಕ್ಷರತೆ ಮತ್ತು ಸಂಖ್ಯಾಜ್ಞಾನ ಅತ್ಯಗತ್ಯ. ಆದ್ದರಿಂದ ಆಯಾ ತರಗತಿಯ ನಿರ್ದಿಷ್ಟ ಕಲಿಕಾ ಫಲಗಳೊಂದಿಗೆ ಬುನಾದಿ ಸಾಕ್ಷರತೆ ಮತ್ತು ಸಂಖ್ಯಾಜ್ಞಾನದ ಕಲಿಕಾ ಚಟುವಟಿಕೆಗಳನ್ನು ಅಂತರ್ಗತಗೊಳಿಸಿ ಕಲಿಕಾ ಚೇತರಿಕೆ ಕಾರ್ಯಕ್ರಮವನ್ನು ರೂಪಿಸಲಾಗಿದೆ. ತಾವು ಇಲ್ಲಿ ನೀಡಿರುವ ಕಲಿಕಾ ಹಾಳೆಗಳನ್ನು ಬಳಸಿಕೊಂಡು ಮಕ್ಕಳಲ್ಲಿ ಬುನಾದಿ ಕಲಿಕಾ ಜ್ಞಾನವನ್ನು ಅನುಕೂಲಿಸುವಿರಿ ಹಾಗೂ ಕಲಿಕಾ ಅಂತರವನ್ನು ಪೂರೈಸುವಿರಿ ಎಂದು ಆಶಿಸುತ್ತೇನೆ. ಇದನ್ನು ಶಾಲಾಧಾರಿತವಾಗಿ ಮೌಲ್ಯಾಂಕನ ಮಾಡುತ್ತಾ ನಿಗದಿತ ಸಾಮರ್ಥ್ಯ ಮತ್ತು ಪರಿಕಲ್ಪನೆ ಗಳಿಕೆಗೆ ಪ್ರಾಮಾಣಿಕ ಪ್ರಯತ್ನ ಮಾಡುತ್ತೀರಿ ಎಂದು ನಂಬಿರುತ್ತೇನೆ. ತಮ್ಮೆಲ್ಲರ ಬೆಂಬಲದಿಂದ ಪರಿಣಾಮಕಾರಿ ಅನುಷ್ಠಾನ ಸಾಧ್ಯ. ಈ ನಿಟ್ಟಿನಲ್ಲಿ ಎಲ್ಲರಿಗೂ ಯಶಸ್ಸನ್ನು ಹಾರೈಸುತ್ತೇನೆ.

**ಶ್ರೀಮತಿ ಪಲ್ಲವಿ ಆಕುರಾತಿ, ಭಾ.ಆ.ಸೇ**
**ಮಾನ್ಯ ರಾಜ್ಯ ಯೋಜನಾ ನಿರ್ದೇಶಕರು,**
**ಸಮಗ್ರ ಶಿಕ್ಷಣ ಕರ್ನಾಟಕ, ಬೆಂಗಳೂರು**



## ಪ್ರಾಸ್ತಾವಿಕ ನುಡಿ

**ಆತ್ಮೀಯರೇ,**

ಹೊಸ ಶತಮಾನದ ಆಶಯಗಳನ್ನು ಒಳಗೊಂಡ ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಶಿಕ್ಷಣ ನೀತಿ–2020ರ ಅನುಷ್ಠಾನ ಸಂದರ್ಭದಲ್ಲಿ ಶೈಕ್ಷಣಿಕ ಕ್ಷೇತ್ರದಲ್ಲಿನ ಬದಲಾವಣೆಗೆ ನಾವೆಲ್ಲರೂ ತೆರೆದುಕೊಳ್ಳಬೇಕಿದೆ. ಅದರ ಜೊತೆಗೆ ಕೋವಿಡ್ ಸಂದರ್ಭದಲ್ಲಿ ಉಂಟಾದ ವ್ಯತಿರಿಕ್ತ ಪರಿಣಾಮವನ್ನು ಸರಿಪಡಿಸುವ ಹೊಣೆಗಾರಿಕೆ ಮಹತ್ತ್ವದ್ದಾಗಿದೆ. ಕಳೆದ ಎರಡು ವರ್ಷಗಳಲ್ಲಿ ಬಹು ಮಾಧ್ಯಮಗಳನ್ನು ಬಳಸಿಕೊಂಡು ವಿದ್ಯಾಗಮ, ಸಂವೇದದಂತಹ ಶೈಕ್ಷಣಿಕ ಉಪಕ್ರಮಗಳ ಮೂಲಕ ಮಾಡಿದ ಪ್ರಯತ್ನಗಳ ನಡುವೆಯೂ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳ ಕಲಿಕೆಯಲ್ಲಿ ಸಾಕಷ್ಟು ಕಲಿಕಾ ಅಂತರ ಉಂಟಾಗಿರುವುದು ವಾಸ್ತವದ ಸಂಗತಿ. ಕಲಿಕಾ ನಷ್ಟ, ಕಲಿಕಾ ಅಂತರ ಪೂರೈಸುವ ಯೋಜನೆಯೇ **'ಕಲಿಕಾ ಚೇತರಿಕೆ'** ಕಾರ್ಯಕ್ರಮ. ಈ ಸಂದರ್ಭೋಚಿತ ಉಪಕ್ರಮದಲ್ಲಿ ಈ ಶೈಕ್ಷಣಿಕ ವರ್ಷದಲ್ಲಿ ಬುನಾದಿ ಸಾಕ್ಷರತೆ ಮತ್ತು ಸಂಖ್ಯಾಜ್ಞಾನ ಸಾಮರ್ಥ್ಯವನ್ನು ಸಾಧಿಸುವುದರೊಂದಿಗೆ, ಹಿಂದಿನ ಎರಡು ಶೈಕ್ಷಣಿಕ ವರ್ಷಗಳ ಆಯ್ದ ಕಲಿಕಾಫಲಗಳು ಹಾಗೂ ಪ್ರಸಕ್ತ ಶೈಕ್ಷಣಿಕ ವರ್ಷದಲ್ಲಿ ಕಲಿಯಲೇಬೇಕಾದ ಅತ್ಯಗತ್ಯ ಕಲಿಕಾಫಲಗಳನ್ನು ಎಲ್ಲಾ ಮಕ್ಕಳಲ್ಲಿ ಸಾಧಿಸುವ ಗುರಿಯನ್ನು ಇಟ್ಟುಕೊಳ್ಳಲಾಗಿದೆ. ಈ ಸಾಧನೆಗಾಗಿ ಕಲಿಕಾ ಪ್ರಕ್ರಿಯೆಯ ಸಾಧ್ಯತೆಗಳನ್ನು ಸೂಚಿಸುವ 'ಶಿಕ್ಷಕರ ಕೈಪಿಡಿ' ಮತ್ತು ಶಿಶುಕೇಂದ್ರಿತ ಕಲಿಕಾ ಪೂರಕ ಚಟುವಟಿಕೆಗಳನ್ನೊಳಗೊಂಡ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳ 'ಕಲಿಕಾ ಹಾಳೆ'ಗಳ ಪುಸ್ತಕ ಎಂಬ ಎರಡು ಸಾಹಿತ್ಯಗಳನ್ನು ಸೃಜಿಸಲಾಗಿದೆ. ಈ ಕಲಿಕಾ ಹಾಳೆಗಳಲ್ಲಿ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳು ಕಲಿಯಲೇ ಬೇಕಾದ ಸಾಮರ್ಥ್ಯ, ಪರಿಕಲ್ಪನೆ ಮತ್ತು ಕಲಿಕಾಫಲಗಳನ್ನು ಕೇಂದ್ರೀಕರಿಸಿದೆ. ಇವುಗಳನ್ನು ಬಳಸಿ ಮಕ್ಕಳ ಕಲಿಕಾ ನಷ್ಟವನ್ನು ಸರಿದೂಗಿಸಲು ಎಲ್ಲಾ ಭಾಗೀದಾರರು ಸಕ್ರಿಯವಾಗಿ ತೊಡಗಿಸಿಕೊಳ್ಳಬೇಕಾಗಿ ಈ ಮೂಲಕ ವಿನಂತಿಸುತ್ತೇನೆ. ಈ ಕಾರ್ಯಾಭಿವೃದ್ಧಿಯಲ್ಲಿ ತೊಡಗಿಸಿಕೊಂಡ ಇಲಾಖಾ ಮಿತ್ರರು ಮತ್ತು ಅಜೀಂ ಪ್ರೇಮ್‌ಜೀ ಫೌಂಡೇಶನ್ ಇವರಿಗೆ ಅಭಿನಂದನೆಗಳನ್ನು ಸಲ್ಲಿಸಿದೆ.

ಶುಭವಾಗಲಿ.

**ಶ್ರೀಮತಿ ಸುಮಂಗಲ ವಿ**
**ನಿರ್ದೇಶಕರು,**
**ರಾಜ್ಯ ಶಿಕ್ಷಣ ಸಂಶೋಧನೆ ಮತ್ತು ತರಬೇತಿ ಇಲಾಖೆ, ಬೆಂಗಳೂರು**

# मार्गदर्शन

डॉ.एस. सेल्वकुमार (भा.प्र.से.)
प्रधान कार्यदर्शी
प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण इलाखा, बेंगळूरु.

डॉ. विशाल आर. (भा.प्र.से.)
आयुक्त
सार्वजनिक शिक्षण इलाखा, बेंगळूरु.

श्रीमती पल्लवी आकुराती(भा.प्र.से.)
राज्य योजना निर्देशक
समग्र शिक्षण कर्नाटक, बेंगळूरु

श्रीमती सुमंगल वी.
निर्देशक डि.एस.इ.आर.टी.
बेंगळूरु .

# साहित्य रचना समिति

जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था, शिवमोग्गा यांच्या विद्यमाने

डॉ. हरीप्रसाद जी.व्ही.
वरीष्ठ प्राध्यापक, डायट शिवमोग्गा

डॉ. नागेश के.टी.
अझीम प्रेमजी फौंडेशन जिल्हा संस्था मंड्या

ओमप्रकाश गुप्ता जी.पी.
अझीम प्रेमजी फौंडेशन विजयपूर

# भाषांतर समिती सदस्य

जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था, चिक्कोडी यांच्या विद्यमाने

श्री एस.आर. मरडी (स.शि.)
स.मराठी उच्च प्राथ. शाळा,इंगळी,जि:चिक्कोडी

श्री एम.एस. कोळी(स.शि.)
स.मराठी उच्च प्राथ.

शाळा,मानेवाडी,जि:चिक्कोडी

श्री एम. ए. पाटील (स.शि.)
स.मराठी उच्च प्राथ.शाळा,संभाजीनगर निपाणी,जि:चिक्कोडी

श्री सी.ए.कुंभार (सी.आर.पी.)
सी.आर.सी. अक्कोळ जि. चिक्कोडी.

परिशिलन
श्री एम. ए. पाटील (स.शि.)
स.मराठी उच्च प्राथ.शाळा,संभाजीनगर निपाणी,जि:चिक्कोडी

संयोजक
इ.वि.जी. विभाग, डी.एस.ई. आर .टी. बेंगळूरू

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | घटक | पान नंबर |
|---|---|---|
| | अध्ययन पुनर्प्राप्ती - एक उपक्रम | 1 |
| | अध्ययन पुनर्प्राप्ती कसे असावे, कसे नसावे | 2 |
| | अध्ययन पुस्तकातील पहिले पान विद्यार्थ्यांसोबत संवाद | 5 |
| 1 | इतिहासाचे स्त्रोत | 6 |
| 2 | इतिहासातील कालगणना | 7 |
| 3 | मध्ययुगीन भारताचा पाया | 8 |
| 4 | मध्ययुगीन भारत, इतिहासाची कालगणना | 8 |
| 5 | उत्तर आणि दक्षिण भारतातील ऐतिहासिक घटना मधील आंतरसंबंध | 10 |
| 6 | मध्ययुगीन शासन पध्दती | 11 |
| 7 | सामाजीक धार्मिक परिस्थिती | 13 |
| 8 | युध्दाची कारणे आणि परिणाम | 14 |
| 9 | जलमार्गाचा शोध | 15 |
| 10 | ईस्ट इंडिया कंपनी सत्तेचा विस्तार | 16 |
| 11 | ब्रिटीश सत्तेचा शेतीवर झालेला परिणाम | 16 |
| 12 | भारताचे पहिले स्वातंत्र्य युध्द आणि ब्रिटिशांच्या सुधारणा | 17 |
| 13 | सामाजिक आणि धार्मिक सुधारणा | 18 |
| 14 | गांधीयुग | 19 |
| 15 | कर्नाटक एकीकरण आणि सीमावाद | 20 |
| 16 | दिशा | 21 |
| 17 | नकाशे | 22 |
| 18 | खंड | 23 |
| 19 | हवामान | 24 |
| 20 | आशिया खंड | 25 |
| 21 | संविधानाची गरज | 26 |
| 22 | मूलभूत हक्क आणि कर्तव्ये | 27 |
| 23 | राज्याची मार्गदर्शक तत्वे | 28 |
| 24 | आपली संरक्षण दले | 29 |
| 25 | समाजविज्ञान शिकण्याच्या सुलभ पध्दती | 29 |

# 1.अध्ययन पुनर्प्राप्ती  एक उपक्रम

अध्ययन प्राप्तीसाठी शिक्षणाचा अभ्यासक्रम, अध्ययन निष्पत्तीसाठी पाठ्यपुस्तकामध्ये अंतर्भूत केला आहे. अध्ययन निष्पत्तीसाठी पाठ्यपुस्तके एक साधन ठरते. अध्ययन निष्पत्ती हे मूलभूत सामर्थ्य  ठरविते. शिक्षण प्रक्रियेत भाषा एक आवरण आहे. या भाषेतील आंतरक्रिया निरंतरपणे अध्ययन अनुभव म्हणून घेतले पाहिजे ना ? हे अध्ययन अनुभव घेण्यासाठी, ठरविलेल्या इयत्तेमधील प्रक्रियेपासून प्रत्यक्षपणे मागे राहिलेला विद्यार्थी त्याच्या पूर्व अध्ययन प्रक्रिया प्रसंगात किती मागे राहिला आहे ? ते पुन्हा प्राप्त कसे करावे ? हा  प्रश्न पडल्यास आम्ही आमच्या वर्गात आमच्या विद्यार्थ्यांसोबत आपणच नियोजन केलेले उपाय म्हणजेच अध्ययन पुनर्प्राप्ती  होय. हे एक साहित्य नसून, सेतूबंध योजनाही नसून, पुनरावलोकन पध्दतही नाही. अध्ययन हे अमूर्ताकडून मूर्ताकडे जाण्याची प्रक्रिया आहे. ही प्रकिया वर्गापुरती मर्यादित राहू नये हे पाहिले पाहिजे ही पाठ्यांतर्गत इयत्ता समन्वयीकरण लाभलेली क्रियाशीलता होय. गमावलेले कोठे गमावले? तेथेच शोधणे, तेथेच वापर करणे या आशयासाठी आपण सर्वजण भाग घेऊया. इथे दिलेले प्रस्तुत साहित्याचे विस्तृत उद्देश पुढील प्रमाणे-

- समाजविज्ञान विषय आवडीने वाचण्याच्या सुधारित पध्दतीचा अवलंब करणे. सामाजिक मूल्ये, सामाजिक शिक्षणासह समाज विज्ञानातील घटनात्मक मुल्य, संस्कृतीचा इतिहास व भौगोलिक माहिती जाणून घेणे.
- इतिहासात आपल्या आजूबाजूला उद्याची वस्तुस्थिती लपलेली असल्याने, वर्तमानात निरंतरपणे आपली मुले प्रथम माझे गांव, गावची भौगोलिकता, इतिहास, सामाजिक रचना, संस्कृती, लोककथा, लोकशाही मूल्य, आचारविचार, रुढी, संप्रदाय माझ्या कुटुंबाची आर्थिकता, व्यावहारिकता समजून घेण्याबरोबर समाज विज्ञानाचे समायोजन करतात.
- समाजविज्ञान विषयाची परिकल्पना दैनंदिन जीवनातील वास्तविकता यांच्या समन्वयाद्वारे दैनंदिन जीवनातील घटना, भौगोलिक परिकल्पना याचे सरळ अध्ययन क्रियेद्वारे प्रायोगिक अध्यापन पध्दतीने उंचावणे.
- वयानुसार अध्ययन अनुभव पाहिजे असणारा विद्यार्थी काही कारणामुळे पूर्वज्ञान, मुळ सामर्थ्याचे अध्ययन निरंतरपणे नसून, पूर्वानुभवाच्या कमतरतेमुळे मागे असणाऱ्या विद्यार्थ्यास ज्ञानाच्या समकालीन आणणे.
- समाजविज्ञान अभ्यासाने समाजातील संस्कृती, परंपरा, रुढी, संप्रदाय, आचार-विचार याबद्दल अर्थग्रहण करुन भारताच्या विविधतेविषयी अभिमान बाळगतो.
- कृत्रिम प्रक्रिया म्हणून शिकण्याऐवजी विविध क्रिया नाटक, गाणी, नृत्य, प्रादेशिक कला आणि अशा कृतीद्वारे समाजविज्ञानाची आवड निर्माण करणे.
- भारताचा इतिहास, भौगोलिकता, सामाजिकता, आर्थिक व्यवहार यांचा पूर्ण अर्थ ग्रहण करुन गौरव आणि अभिमान बाळगणे.

# अचूक उद्दिष्टे-

कोविड -19 च्या प्रसंगामुळे निर्माण झालेल्या अध्ययनातील कमतरता सुलभ करण्यासाठी मूलभूत अध्ययन सामर्थ्य आणि मागील दोन वर्षात विद्यार्थी शिकले पाहिजे होते त्या परिकल्पना यांचा समन्वय साधून प्रस्तुत अध्ययन वर्षातील अध्ययन सामर्थ्य विद्यार्थ्यास सरळ अध्ययनासाठी अनुकूल करुन देणे होय. अध्ययन पुनर्प्राप्ती केवळ विद्यार्थी कृतीस समाविष्ट आहे. मुलाच्या अध्ययन निरंतरतेसाठी चैतन्यदायी अध्ययन आणि अध्ययनातील नवीन मार्ग शोधण्यास प्रवृत्त करणे.

## 2. अध्ययन पुनर्प्राप्ती कसे होऊ नये ? कसे व्हावे ?

कोणत्याही योजनेच्या कार्यानुष्ठानामध्ये काही मर्यादा असणे साहजिक आहे. त्या मर्यादा पुढे ठेवून टीका करण्याची वृत्ती आपण पाहिली आहे. अशा समस्यांमधून बाहेर येण्यासाठी आपण सकारात्मक असले पाहिजे आणि त्यासाठी आपण तयार आहोत.

**अध्ययन पुनर्प्राप्ती कसे होऊ नये ?**

1. हा केवळ एक कार्यक्रम नाही. नोंदी तयार करायच्या म्हणून नोंदीही नाहीत. या प्रक्रियेबद्दल विवरण दिल्यावर विद्यार्थी निर्वाहन करतात अशा भ्रमात असू नये.
2. अध्ययन पत्रक मुलाचे गृहपाठ नाही. मुले पत्रक लिहून संपवतात एवढाच उद्देश नाही.
3. अध्ययन पुनर्प्राप्ती ची पारंपारिक अध्यापन पध्दती अपेक्षित लाभ देत नाही.
4. या प्रक्रियेत केवळ मुलगा जबाबदार नाही.
5. मुलाच्या अध्ययन पत्रिकेचा परीक्षेपुरताच वापर होऊ नये.

**असे झाल्यास उत्तम**

1. शिक्षण साधन धोरणांना प्रोत्साहन देणे.
2. वाचन, लेखन, मौखिक अभिव्यक्ती, अस्खलित होईल असा विचार करुया.
3. अध्ययन पत्रक देण्यापूर्वी संकल्पनेसाठी मुलांचा पुर्वानुभव आवश्यक स्थानिक संदर्भ स्पष्ट करुया.
4. शिक्षण पूर्वग्रह आणि वर्तमान अनुभव यांचा समन्वय साधूया.
5. खेळ, स्पर्धा, मौखिक अभिव्यक्ती, स्थळांना भेटी, प्रसंग निर्माण करणे, छोटे नाटक अशा पध्दती वापरुन वैचारिक परिकल्पनेसाठी अनुभव घेण्याची संधी देऊया.

## वर्गातील समन्वय

मुले यावर्षी शिकत असलेले अध्ययन अंश मागील वर्षीच्या अध्ययन अनुभवावरुन पायाभूत सामर्थ्ये दरवर्षी प्राप्त करत असतात. अशा पध्दतीने क्रमबध्द चालत आलेली शिक्षण प्रक्रिया सुलभ करण्यासाठी संकल्पनात्मक पार्श्वभूमी समजून घेणे आवश्यक आहे.

### ही प्रकिया वर्गात दोन प्रकारे संप्रेषित केली जाऊ शकते.

1. **प्रथम प्राधान्य पध्दत -** अध्ययन पुनर्प्राप्ती कार्ययोजनेच्या ठरवलेल्या वेळेत पायाभूत सामर्थ्याच्या आधारे पाच अध्ययन अंशांना प्रथम प्राधान्य देऊन शिकविणे आणि मूल्यांकन करणे.

2. **दुय्यम प्राधान्य पध्दत -** पाठ अध्ययनावेळी एका अवधीत पायाभूत सामर्थ्य शिकवल्यानंतर, यावर्षीच्या अध्ययन निष्पत्तीसाठी आवश्यक पाठ शिकवून घटक परीक्षेच्या आधारे मूल्यांकन करणे.

**शिक्षकाची तयारी :**

1. शैक्षणिक कृती आणि त्याचे नियोजन करणे.
2. संदर्भ उपकरणांची तयारी करणे.
3. मुलांना उपक्रमाद्वारे संकल्पना स्पष्ट करण्यासाठी प्रेरणा देणे.
4. संकल्पनेचा विस्तार, वर्तमान अध्ययनांश समन्वय होय.
5. अध्ययनपत्रक पूर्ण करण्यास सुलभ करणे.
6. विद्यार्थ्यांच्या शिकण्याचा प्रगतीचा आढावा घेण्यासाठी चारही स्तराची मदत होईल.
7. शिक्षकांचा अभिप्राय नमूद करणे.
8. अध्ययन पत्रकाच्या मूल्यांकनावरुन पुनरावलोकन क्रिया करणे.

## शिक्षण कालावधी निर्णय

आपण विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक भिन्नता (वेगळेपणा) लक्षात घेऊन कालावधी ठरवावा. त्यासाठी प्रादेशिक भिन्नता, शिक्षणाचे स्तर, शिक्षण परिसर अशा बाबींचा विचार करावा.

## मूल्यमापन

प्रत्यक्ष शिक्षण विभागाकडून आदेश परिपत्रके येतात. तरीही शिक्षण पत्रकातील क्रिया योजना करत असताना आपण निरीक्षण केल्यानंतर, त्यातील सारांश संग्रहीत केले पाहिजे. चार स्तरावर विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे निरीक्षण केले आहे. त्यासाठी विद्यार्थी स्वावलोकन नमुना शिक्षण पत्रकामध्ये दिले आहे.

## अपेक्षित अध्ययन निष्पत्ती

| पूर्ण केलेले अध्ययन अंश (विद्यार्थी लिहितो) | समजले आहे शेकडा 30 ते 49 | आकलन/ अर्थग्रहण झाले शेकडा 50 ते 60 | समजलेले अध्ययन अंश सहकाऱ्याबरोबर चर्चा करुन सांगतात शेकडा 61 ते **90** | याला संबंधित इतर अध्ययन अंश स्वत: सांगतो शेकडा **91** ते **100** |
|---|---|---|---|---|
| | | | | |

उदाहरणे :-

| अ.नं. | सामर्थ्य पातळी | विवरण |
|---|---|---|
| 1 | समजलेले आहे | अध्ययन निष्पत्तीमध्ये समाविष्ट अंश प्राप्त केले नाही किंवा थोडे समजले आहे. किंवा शिक्षकांची पूर्ण |

| | | |
|---|---|---|
| | | मदतीची गरज आहे. |
| 2 | आकलन झाले आहे | काही अंश स्पष्ट झालेत/काहीमध्ये स्पष्टतेला संधी आहे. शिक्षकांची, मित्रांची थोड्या प्रमाणात मदतीची गरज आहे. |
| 3 | आकलन झालेले अंश सहकाऱ्याबरोबर चर्चा करतो | अध्ययन निष्पत्ती सर्व अंशामध्ये आवश्यक स्पष्टता आहे/शिकलेले सहकाऱ्यांबरोबर चर्चा करतो. शिक्षकांनी मुलांना अध्ययन अंशावर प्रश्नोत्तरे लिहिण्याचे काम दिले पाहिजे. |
| 4 | याला संबंधित इतर अंश स्वत: सांगतो | अध्ययन निष्पत्ती अंशामध्ये स्पष्टता आहे / जास्त स्पष्टता आहे. शिक्षकांनी मुलांद्वारे सकारात्मकता वर्गाच्या बाहेर विस्तार करण्यासाठी संपूर्ण संधी दिली पाहिजे. मुलांच्या सृजनशीलतेचे निरीक्षण करा. |

## अध्ययन निष्पत्ती :
## इतिहासाचे मूळ स्त्रोत जाणून घेणे.

- इतिहास रचनेला आवश्यक मुलस्त्रोतांविषयी समजून घेतात.
- इतिहासाच्या मुलस्त्रोतांच्या संरक्षणाची मनोभावना वाढविणे.

वरील दोन्ही मुख्य उद्देश साध्य करण्यासाठी विद्यार्थ्यांनी कृती अर्थबध्दपणे पूर्ण करणे गरजेचे आहे. अध्ययनपत्रकामध्ये दिलेल्या कृतीच अंतीम नाहीत. मुलाचे अध्ययन निष्पती समग्रपणे बघून मुलांचे अध्ययन स्तर ओळखावे.

| पूर्ण झालेले अध्ययन घटक | सामर्थ्य स्तर | इतिहासातील स्त्रोतांविषयी माहिती देणे |
|---|---|---|
| समजून घेतले | 1 | मुलांनी फक्त काही प्रकारचे पुरावे ओळखले आणि जर त्याला कोणतेही स्त्रोत माहित नसेल तर त्याला फक्त प्रतिमा, दगडाचे मंदिर म्हणून ओळखेल |
| आकलन झाले आहे. | 2 | मुलगा मुलाधार ओळखतो. काही वेळा गोंधळलेला दिसतो. संरक्षणा साठी लवकर अभिप्राय देतो. |
| आकलन झालेले अंश मित्रासोबत चर्चा करतो. | 3 | मूळ स्त्रोत ओळखून इतिहास निर्मिती मध्ये मूलस्त्रोताचे महत्त्व समजतो आणि समंजसपणे अभिप्राय व्यक्त करतो आणि सहकाऱ्याबरोबर अध्ययनांशाची चर्चा करतो. |
| संबंधित इतर अंश स्वत: सांगतो | 4 | विद्यार्थी इतिहासातील स्त्रोत ओळखतो, हे स्त्रोत वाचवण्यासाठी विशाल मनोभावना बाळगतो. त्याच्या रक्षणासाठी त्याला करावे लागणारे छोटेमोठे कार्य करतो. संधी मिळाल्यास आजूबाजूच्यांना रक्षणाचे महत्त्व समजावून सांगतो. |

## शिक्षकांना सूचना

अध्ययन निष्पत्ती संपूर्णपणे प्राप्त करण्यासाठी दिलेले अध्ययनपत्रक केवळ एक लहान साधन होय. हे अध्ययनपत्रक काही वेळा अध्ययन निष्पत्तीचे मोजके अंश मात्र साध्य करतात. त्यामुळे शिक्षकांनी पूर्ण अध्ययन निष्पत्तीसाठी आणखीन जास्तीचे कृती कार्य हाती घेणे गरजेचे आहे. एवढेच नव्हे तर वर्गाबाहेर देखील अध्ययन प्राप्ती मिळवण्याची संधी मुलांना दिली पाहिजे हे लक्षात असावे.

याचे मूल्यमापन काटेकोरपणे मुलांना ग्रेड घालण्यासाठी नाही तर शिक्षकांनी मुलांचे अध्ययन स्तर निर्दिष्टपणे ओळखणे हा उद्देश आहे. मुलांचे अध्ययन स्तर समजल्यानंतर मुलांना पुढील अध्ययन स्तराला नेण्यासाठी फार गरजेचे आहे. या मुख्य उद्देशासाठी याची रचना करण्यात आली आहे.

# 3. अध्ययन पत्रक पुस्तकातील पहिले पान

## विद्यार्थ्यांशी संवाद

आमचे अध्ययन पुनर्प्राप्ती साहित्याला खालीलप्रमाणे सुरुवात होते. येथे ते बोलण्याचे कारण, येथे असणाऱ्या विद्यार्थ्यांना समजून घेऊन त्यांच्याशी बोलणे आणि मानसिक सुरक्षितता पुरविणे. विद्यार्थ्यांनो, कोविड - 19 च्या संक्रमित रोगाच्या प्रसंगाला सामोरे जाऊन तुम्ही आता सातवीच्या वर्गात आलात, कित्येक दिवस तुम्ही खेळ, वाचन, गम्मतजम्मत सोडून घरांमध्ये राहण्याचा प्रसंग तुम्ही समर्थपणे स्वीकारलात. तुम्ही हुशार आहात. वर्गांमध्ये समाजविज्ञान शिकण्यासाठी तुमचे स्वागत. सहावीच्या वर्गातील मुले शिकायला पाहिजे होते ते पुढील वर्षी सातवीच्या वर्गात गेल्यानंतर समजून घ्यावयास हव्या त्या परिकल्पनेचे स्रोत या शिक्षणपत्रक पुस्तकांमध्ये तुम्हाला दिले आहे. तुम्ही स्वत: किंवा मित्रांबरोबर गरज लागेल तिथे शिक्षकांच्या साहाय्याने या पुस्तकात दिलेल्या कृती करणार आहात. असेही हुशार आहात. काही ऐकून तुम्ही स्वत: करावयाच्या कृती येथे जास्त आहेत. ते तुम्ही कराल आणि तुमचे अध्ययन छान होईल अशीच प्रार्थना करतो.

**या पुस्तकातील अध्ययन पत्रकाचा वापर खालीलप्रमाणे करा.**

कृती :- स्वत: अथवा तुमच्या मित्राबरोबर दिलेल्या कृतीमध्ये सहभागी व्हा.

कृती :- दिलेल्या विषयासंबंधी विचार करा आणि जास्तीत जास्त तुमच्या मित्रांबरोबर भाऊ-बहीण शिक्षकांबरोबर दिलेल्या विषयावर बोला. तुमच्या पाठ्यपुस्तकासोबत दिलेले साहित्य वाचा आणि अध्ययन पत्रकात केलेल्या कृती करा. काही जास्तीचे गरजेचे असल्यास तुमच्या शिक्षकांशी चर्चा करा. तसेच मुखपृष्ठावर दिलेल्या DSERT च्या पत्त्यावर पत्र किंवा ईमेल द्वारे संपर्क करा. आवडीने शिका, आनंदाने वाढा.

# अध्ययन घटक 1 : इतिहासाचे मूळ स्त्रोत

**अध्ययन निष्पत्ती :** इतिहासाचे मूळ स्त्रोत जाणून घेणे.

**उद्दिष्टे :**

कृती :- इतिहास रचनेसाठी आवश्यक मूलस्त्रोताविषयी जाणीव करुन देणे.

कृती :- त्यांच्या रक्षणाचे महत्त्व समजावून देणे.

कृती :- स्वत:च्या दैनंदिन जीवनात वापरत असलेल्या वस्तूंवर इतिहास लिहिण्याचे कौशल्य वाढविणे.

**अध्ययन सामग्री/साहित्य :**

शाळेचे मूळ दस्तऐवज, इतिहासाधारित चित्रे, पाठ्यपुस्तक

**प्रकिया :**

शिक्षक विद्यार्थ्यांना इतिहासाचे मूलस्त्रोत समजावून देण्यासाठी शाळेचा मूळ इतिहास सांगतात. प्रथम शाळेचे चित्र दाखवतात, शाळेची सध्याची स्थिती मुलांकडून सांगून घेतात. त्यानंतर शाळेच्या प्रारंभाविषयी मुख्याध्यापक गावातील ज्येष्ठ नागरिकांकडून माहिती गोळा करण्यास सांगतात. संग्रहित केलेल्या माहितीवर चर्चा करुन इतिहास समजून घेण्यास कोणकोणते पुरावे आहेत ते समजून घेतात. नंतर कृतींच्या आधारे मुलांना मार्गदर्शन करुन इतिहास रचनेसाठी कोणकोणते पुरावे आहेत आणि ते कसे मदत करतात याविषयी समजावून सांगतात व त्याचे रक्षण का केले पाहिजे? याचे महत्त्व मुलांना समजावून सांगतात. अध्ययन पत्रिकेतील कृती स्वत: मुलांकडून करुन घेणे. गरज असेल तिथे शिक्षकांनी मार्गदर्शन करावे.

**अध्ययन पत्रक 1 :**

**कृती 1 :-** माझ्या शाळेविषयी मला किती माहिती आहे ?

**कृती 2 :-** शालेय इतिहासाचे मुळ स्त्रोत शोधूया?

**कृती 3 :-**शालेय इतिहासावर चर्चा करुया.

कृती एक, दोन आणि तीनला आधारित माहिती संग्रह करण्यास संधी देणे, गरज असेल तिथे स्वत: माहिती देणे.

**गट चर्चा :**

मुलांचे दोन किंवा गरजेपुरते गट तयार करुन कृती क्रमांक तीन विषयी चर्चा करुन मत व्यक्त करण्यास संधी उपलब्ध करुन देणे. चर्चेतील अंश एकत्र करुन इतिहास रचनेमध्ये पुरावे कसे महत्त्वाचे ठरतात ते सांगतात. अध्ययन पत्रक दोन मध्ये पुराव्याचे अर्थ समजून घेण्यास प्रयत्न करणे.

**अध्ययनपत्रक 2 :**

**कृती 1:-** चित्र ओळखून नावे सांगूया.

या कृतीत दिलेल्या चित्रांचे निरीक्षण करुन ओळखण्यास सांगणे. इथे काही मुलाधार चित्र स्वरुपात दिले असून, इतर आधाराची चित्रे वापरुन पुराव्याची माहिती करुन देणे व दोन्हीची तुलना करुन अर्थ समजावून सांगतात. उदा. सत्तेचा परिचय करुन घेताना, आजचे शिलान्यास (शाळा बांधकाम, शिलान्यास) याची तुलना करणे त्याबरोबर हे इतिहास रचनेसाठी कसे मदत करतात याचा अर्थ समजावून सांगणे.

**कृती 2 :-** इतिहास रचनेमध्ये तुमच्या अवतीभोवती असणाऱ्या स्मारकांची यादी करुन स्थळे, स्मारके ओळखून विद्यार्थ्यांना यादी करण्यास संधी उपलब्ध करुन देणे. त्यासाठी मार्गदर्शन करणे. नंतर त्याच्यावर चर्चा करुन इतिहास रचनेसाठी काय मदत केली आहे हे समजावून देवून यानुसार विद्यार्थी इतिहासातील या पुराव्याच्या रक्षणाचे महत्त्व समजावून घेण्यास सांगणे.

**कृती 3 :-** आपल्या सभोवताली अनेक स्मारके, किल्ले, जुने बांधकाम, सत्ताकेंद्रे आणि इतर अवशेष दिसतात. त्याचे आपण रक्षण का केले पाहिजे? याचा विचार करुन, चर्चा करुन स्मारकांच्या रक्षणासाठी आपण काय केले पाहिजे? काय करु नये? याची यादी करण्याची संधी मुलांना देणे. नंतर सर्वांना यादी प्रस्तुत करण्यास संधी देणे. संरक्षण कसे करावे आणि त्याचे महत्त्व काय याची समज करुन देणे.

**मूल्यमापन :**

अध्ययनपत्रक दोन ची कृती एक मूल्यमापन कृती म्हणून वापरावे.

## अध्ययन घटक 2 : इतिहासाची कालगणना

**अध्ययन निष्पत्ती :**

इतिहासातील कालगणनेची विशेषता ओळखणे (दशमान, शतमान, सहस्त्रमान, सामान्य शके आणि सामान्य पूर्व शके)

**उद्दिष्टे :**

इतिहासातील कालगणनेची विशेषता आणि महत्त्व समजून घेणे. दोन घटना समजून घेऊन कालानुक्रमाने विवरण करणे.

**प्रक्रिया :**

शिक्षकांनी मुलांना कालगणने विषयी असलेले पूर्वज्ञान समजून घेणे. प्रश्न विचारुन कालगणनेच्या विशेषता सांगणे, दशमान, शतमान, सामान्य शके, सामान्य पूर्व शके याचा अर्थ समजावून देणे. नंतर मुलांना घडलेल्या घटना काळानुसार लिहिण्यास व विवरण करण्यास संधी प्राप्त करुन देणे. तसेच कालगणनेचे महत्त्व समजण्यास मदत करणे.

**अध्ययन पत्रक 3 :**

**कृती** 1:-शतमान याचा अर्थ समजावून घेऊया. या कृतीद्वारे मुलांना प्रश्न विचारत शतमानाची परिकल्पना समजावून देणे.

कृती 2:- खालील कोष्टकात इसवी दिले आहे. हे कोणत्या शतमानात येतात ते शोधूया. दिलेले कोष्टक मुलांना भरण्यास संधी करुन देणे.

कृती 3:- कालानुक्रमे लिहूया. मार्गदर्शनानुसार मुलांकडून स्वत: कालानुक्रम, काल रेखा आवश्यक असल्यास स्पष्ट करणे.

**मूल्यमापन :**

अध्ययन पत्रक तीनच्या कृती क्रमांक तीन मूल्यमापन कृती म्हणून विचारात घ्यावे.

# अध्ययन घटक 3 : मध्ययुगीन भारताचा पाया

**अध्ययन निष्पत्ती :**

मध्ययुगीन भारताच्या इतिहासाची पुनर्रचना करण्यासाठी उपयुक्त ठरु शकणारे स्त्रोत ओळखणे.

**उद्दिष्टे :**

- मध्ययुगीन भारताच्या इतिहासाची महत्त्वाची मूलतत्वे ओळखणे,
- वास्तूशिल्प पायावर आधारित इतिहास घडविण्याचे कौशल्य विकसित करणे.

त्याच्या स्थळीय स्मारकांचा प्रकार, शैली यांचा परिचय करुन देऊन, फरक आणि बदल सांगणे. या अध्ययन घटकामध्ये केवळ साहित्य आणि पुरातत्त्व न घेता, स्थापत्यकलेचा आदर्श घालून इतिहासाची उभारणी कशी करता येईल हेच पाहाण्यात आले आहे. शिक्षकांनी मुलांना हे पटवून दिले पाहिजे की, ते इतर स्त्रोतांचा वापर करुन अशाच पध्दतीने इतिहास घडवू शकतात.

**अध्ययन साहित्य :**पाठ्यपुस्तक, विविध राजमान्य वास्तुशिल्पांची चित्रे

**प्रक्रिया :**

मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील महत्वाच्या घटनांबद्दल परिचय, ऐतिहासिक पायामधील भौतिक वादाचे महत्त्व आणि स्थानिक संदर्भाच्या संबंधात त्याचे महत्त्व समजून घेण्याबरोबर मुलांचे गट तयार करा. प्रत्येक गटाला राजेशाही वास्तुकलेची चित्रे पाहण्यास सांगा आणि त्यांचे मत विचारुन त्यांचे अभिप्राय एकत्रित करा.

**अध्ययन पत्रक 4 :**

कृती 1:- मुलांनो खाली तुम्हाला हळेबीडू च्या होयसळ मंदिरातील काही शिल्पांची चित्रे दिली आहेत, ती पाहून काही प्रमुख अंश लिहाल काय? मुलांची उत्तरे एकत्र करुन चित्रे दाखवत प्रत्येकाचे स्पष्टीकरण द्यावे.

**अध्ययन पत्रक 5 :**

कृती 1:- तुमच्या पुस्तकात वास्तूशिल्पांचे प्रकार दिले आहेत. तुमच्या शिक्षकाबरोबर चर्चा करा. मुलांनी संग्रह केलेली माहिती एकत्रित करुन फरक सांगणे.

कृती 2:- विजयनगर, बहामनी आणि आदिलशाही घराण्याशी संबंधित स्मारके दिली आहेत. ही स्मारके ओळखून ते इतिहास रचनेत कसे मदत करतात ते वर्गामध्ये चर्चा करा.

मुलांना चित्रे ओळखण्यासाठी पाठ्यपुस्तक किंवा इतर साधन शोधण्याची संधी प्राप्त करुन देणे. वास्तुशिल्पांमध्ये प्रामुख्याने लक्ष देण्यासारखे अंश शोधून माहिती देणे. माहितीच्या आधारे इतिहास लिहिण्याचे क्रम समजावणे. उदा. काळ, स्थळ, प्रसंग, राजघराणे इत्यादी.

- मध्ययुगातील राजघराण्याच्या सत्तेत हिंदू शैलीचे मुसलमान राजांनी, इस्लामिक शैलीचे हिंदू राजांनी स्वत:च्या बांधकामांमध्ये मिश्रण करुन वापर केला आहे. यातून आपण काय शिकू शकतो? याची संबंधित वर्गामध्ये चर्चा करा. मुलांचे गट करुन चर्चा करण्यास संधी द्या. यानंतर प्रत्येक गटाचे अभिप्राय व्यक्त करण्यास संधी उपलब्ध करुन द्या. शेवटी मुलांची चर्चा एकत्र करुन धार्मिक साम्यता या शैलीत दिसून येतात. तसे आपण दैनंदिन जीवनात धार्मिक समानतेचा वापर मनावर बिंबवता आला पाहिजे.

- तुमच्या अथवा सभोवतालच्या गावांमध्ये कोणत्याही एका स्मारकाचे चित्र संग्रह करुन ते चिकटवून त्याला संबंधित वास्तुशिल्प, काळ, कोणी निर्माण केले, इत्यादी अंश लिहा. येथे मुलांच्यात संशोधनात्मक मनोभावना वाढवण्यासाठी स्मारकाचे चित्र, त्याची माहिती संग्रह करण्यास प्रेरणा देणे. शाळा परिसरात एखादे स्मारक असल्यास मुलांना तेथे घेऊन जाऊन चित्राबाबत माहिती देण्यास शिक्षकांनी मदत करावी. एकंदरीत विद्यार्थी इतिहासाला संबंधित कोणताही पुरावा पाहिल्यास स्वत: त्याचे इतिहास सांगण्याचे व लिहिण्याचे कौशल्य वृध्दिंगत करणे.

**मूल्यमापन:** अध्ययन पत्रक दोनचे कृती एक मूल्यमापन कृती म्हणून ग्राह्य धरावे.

## अध्ययन घटक 4 : मध्ययुगीन भारत- इतिहासाची कालगणना

**अध्ययन निष्पत्ती :**

उत्तर आणि दक्षिण भारताशी संबंधित ऐतिहासिक घटनांचा कालक्रम समजून घेणे.

**उद्दिष्टे :**

- मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील घटनांवर आधारित, श्रेणीबध्द ओळखण्याचे कौशल्य सुधारणे.
- समकालीन राजघराणी आणि त्यांचा कार्यकाळ जाणून घेणे.

**प्रक्रिया :**

मुलांना त्यांच्या कुटुंबाची वंशावळ तयार करण्यास प्रेरित करुन त्याच्या आधारे इतिहासातील वंशावळ याचे महत्त्व माहित करुन देणे. मध्यकालीन इतिहासाचा परिचय करुन देऊन मुलांकडून वंशावळ तयार करुन घेणे. या आधारे प्रत्येक कालखंड किंवा घटनेविषयी माहितीच्या आधारे मुलांबरोबर चर्चा करावी.

**अध्ययन पत्रक 6 :**

कृती 1:- विद्यार्थ्यांनो तुमच्या कुटुंबात घडलेल्या घटना कालक्रमानुसार लिहिता का? मी तुम्हाला मदत करेन, लिहा बघू. उदा. तुमच्या कुटुंबातील सदस्यांचे जन्म, इतर समारंभ, इत्यादी कार्यक्रमाची गरज मनात रुजविणे.

**सूचना :**

मध्ययुगातील घटना, कार्यक्रम यादीमध्ये दिलेली वर्षे, घटना, कालानुक्रमाने समजून घेण्यासाठी मात्र वापरले आहे. हे मूल्यांकनासाठी वापरु नये.

**अध्ययन पत्रक 7**

कृती 1:- खाली दिलेल्या घटना रिकाम्या जागेत कालानुक्रमाने जोडून लिहा. मुलांना कसे? का? अशा प्रकारचे प्रश्न विचारुन चर्चा करा.

कालगणना यादीवर दिलेल्या घटना रिक्त स्थानात लिहा. कालक्रमामध्ये काळ शोधण्यास मार्गदर्शन करावे. याच प्रकारे वेगवेगळया काल रेखांचा वेगवेगळया प्रसंगात वापर करावा.

**मूल्यमापन :**

अध्ययन पत्रक सातचे कृती एक मूल्यमापन कृती म्हणून ग्राह्य धरावे.

## अध्ययन घटक 5 :उत्तर आणि दक्षिण भारतातील ऐतिहासिक घटनांमधील आंतरसंबध

**अध्ययन निष्पत्ती :**

उत्तर आणि दक्षिण भारतातील ऐतिहासिक घटनांमधील आंतरसंबंध विवरण करणे.

**उद्दिष्टे :**

मध्यकालीन भारतामध्ये उत्तर आणि दक्षिण भारताच्या राजघराण्यातील संबंध समजून घेऊन विश्लेषण करणे.

प्रस्तुत प्रसंगामधील परस्पर संबंध किती मुख्य आहे ते मनात बिंबवणे.

**प्रक्रिया :**

मुलांचे गट करुन प्रत्येक गटाला एक एक विषय देऊन पाठ्यपुस्तकाच्या सहाय्याने चर्चा करण्याची संधी उपलब्ध करुन देणे.उदाहरणार्थ - वैवाहिक संबंध, राजकीय संबंध, युध्द संबंध, व्यापार आणि वाणिज्य संबंध इत्यादी.

**अध्ययन पत्रक 8 :**

कृती 1:- विद्यार्थ्यांनो, पाठ्यपुस्तकाच्या सहाय्याने उत्तर भारतातील राज्यांचे दक्षिण भारतातील कोणकोणत्या राजांबरोबर कोणत्या स्वरुपाचे संबंध होते ते सांगाल का? पाठ्यपुस्तकाच्या साहाय्याने मुलांना लिहिण्याची प्रेरणा देऊन, सांगितलेल्या प्रक्रिये प्रमाणे संबंध सांगून मुलांच्यातील गोंधळ दूर करणे.

कृती 2:- तुमच्या अवतीभोवती असणाऱ्या गावाबरोबर संबंध कसे आहेत, ते ऐकून समजून घेऊन नंतर सर्वांबरोबर वर्गात चर्चा करा.

वर्गामध्ये विद्यार्थ्यांना संबंधाचे अभिप्राय सांगण्यास संधी द्या. परस्पर सहकार, सामंजस्य, जीवन समाजातील स्वास्थ्य जपण्यासाठी कसे सहायक ठरते त्याची जाणीव करुन देणे.

**मूल्यमापन :**

अध्ययन पत्रक 8 ची कृती 2 मूल्यमापनासाठी ग्राह्य धरावे.

# अध्ययन घटक 6 : मध्ययुगीन शासन पध्दती

**अध्ययन निष्पत्ती :**

त्या काळातील शासन पध्दतींची यादी करुन परिभाषित करणे.

**उद्दिष्टे :**

- मध्ययुगीन भारतातील विविध शासन पध्दतीचे तुलनात्मक अध्ययन करणे. शासन पध्दतीचे फायदे, तोटे, समजून घेऊन सध्यस्थितीला आवश्यक गोष्टी समजावून घेणे.

**अध्ययन साहित्य :** पाठ्यपुस्तक, नकाशे, भू दाखले.

**अध्ययन पत्रक 9 :**

कृती 1:- तुमच्या गावात असणाऱ्या ग्रामसेवक, तलाठी, पी.डी.ओ. यापैकी कोणाही एकाला भेटून ते कसे काम करतात, कारभार कसे चालवतात याविषयी माहिती घेऊन वर्गांमध्ये सांगूया.चर्चेला संधी देऊन राज्यकारभारातील श्रेणी पध्दत व प्रत्येकाची जबाबदारी समजून देणे.

**अध्ययन पत्रक 10 :**

कृती 1:- वर समजून घेतलेल्या शासनपध्दती ज्या प्रदेशात चालू आहेत तेथील नकाशा खाली दिला आहे. ते आपण पाहून समजून घेऊया.

कृती 2:- वरील नकाशा पाहिलात ? त्यामध्ये इक्ता, मनसबदारी आणि नायकत्व पध्दती असणारे प्रदेश शोधा.

1 आणि 2 कृतींना संबंधित असणारे पाठ्यपुस्तकातील कृती पुस्तकातील नकाशा बरोबर शाळेत असणाऱ्या भारताच्या नकाशात पाहाण्यास सांगणे. नंतर कृती दोन करुन घेणेस साध्य होईल तेवढे मुलांकडून ओळखण्यास सांगणे. मुलांना सूचना देणे. उदाहरणार्थ - स्थळ सांगण्यास अवघड वाटल्यास ते कोणत्या जिल्ह्यात आहे इत्यादी.

कृती 3:- इक्ता, नायकत्व, मनसबदारी पध्दतीमध्ये दिसणारी समानता यांची यादी तयार करुया. मुलांच्या उत्तरांचे एकत्रीरकण करुन आजच्या पध्दतीमध्ये दिसून येणारे अंश यांची तुलना करुन कोणती पध्दत चांगली ते मुलांना ठरवू द्या.

**अध्ययन पत्रक 11 :**

कृती1:-आपण अल्लाउद्दीन खिलजीच्या बाजारपेठ व्यवस्थेविषयी समजून घेतलं नाही का? आता आपण त्याची बाजारपेठ व्यवस्था आणि आजची बाजारपेठ व्यवस्था यातील समानता व फरक लिहू या.दोन्हीतील साम्य,भेद एकत्र करुन दोन्हीत कोणते उत्तम अंश आजच्या व्यवस्थेत वापरता येईल अशा प्रमुख अंशांची यादी करुन बाजारपठेत कोणत्या सुधारणा केल्या पाहिजेत याविषयी चर्चा करणे.

कृती 2:- विचार करुन उत्तरे देऊ या. व्यापारासाठी वजन आणि मापन आवश्यक आहे का? विचार करुन उत्तरे द्या. विविध प्रकारचे वजनयंत्राचे परिचय करुन, मागील वजनपध्दती, आताची पध्दती यातील फरक सांगणे आणि त्यापासून होणारे फायदे मुलांना स्पष्ट करणे.

कृती 3:-बाजारपेठ व्यवस्थेमध्ये कनिष्ठ हमीभाव निश्चित करण्यासाठी शिक्षकांच्या सहाय्याने चर्चा करा.चर्चा करण्याअगोदर हमीभाव म्हणजे काय हे सांगावे. याच्या आधारावर त्याचे साधकबाधक विषयी गटचर्चा आयोजित करुन, नंतर मुलांच्या चर्चेचे विषय विचारात घेऊन, हमीभावाची गरज याविषयी मुलांना महत्त्व सांगणे.

कृती 4:- तुमच्या गावातील रेशन दुकानात जीवनावश्यक वस्तू कमी दराला विकतात का? वर्गामध्ये तुमच्या मित्राबरोबर चर्चा करुन, गटचर्चा आणि मार्गदर्शन करा.

कृती 5:- खाली दिलेल्या वस्तूंची बाजारातील आणि रेशन दुकानातील किमती शोधून लिहा. एकाच प्रकारच्या वस्तूंची किमत वेगवेगळी का असते? याचे कारण काय? ते मुलांना मौखिक विचारुन, उत्तर एकत्र करुन ते लक्षात ठेवण्यास सांगा.

कृती 6:- तुझ्या गावातील ज्येष्ठांना आणि व्यापाऱ्याकडून किंवा आजूबाजूच्या बाजार अथवा बाजारपेठेला भेट देऊन त्यांच्याशी बोलून माहिती धेऊन अभिप्राय सांगा. एखाद्या व्यापाऱ्याला शाळेत बोलावून, मुलांसोबत चर्चा करण्याची संधी उपलब्ध करुन त्यांच्याविषयी मुलांना सांगणे.

**अध्ययन पत्रक 12 :**

कृती 1:- फिरोजशहा तुघलक आणि आजच्या शेती योजनांमधील समानता यादी तयार करा.

कृती 2:- शेतकरी कर्जमाफी करण्याचे उद्देश आणि त्याचे परिणाम वर्गात शिक्षकांच्या साहाय्याने मित्रांसोबत चर्चा करुन आपल्या पालकांसोबत माहिती समजावून घेऊन वर्गामध्ये मुक्त चर्चा करण्यास संधी उपलब्ध करुन देणे. शिक्षकांनी शेतकरी कर्जमाफीची साधकबाधक माहिती देवून अंतीम निर्णय मुलांवर सोपवितात.

कृती 3:- भूमीचे मोजमाप का करतात? तुमचे घर, शेत कसे मोजतात? हे ज्येष्ठांकडून चर्चा करुन समजून घ्या आणि वर्गात चर्चा करा.

1, 2 आणि 3 यांना संबंधित मागील काळातील शेतकरी कल्याण योजना आजही लहान प्रमाणात बदल करुन अस्तित्वात आहेत, कोणत्याही योजना जनकल्याणकारी असल्यास त्या दीर्घकाळ टिकतात, हे समजावून देतात.

कृती 4:- तुमच्या गावातील महसूल विभागातील अधिकाऱ्याना भेटून महसूलाविषयी माहिती समजून घेऊन लिहा. महसूल का गोळा करतात, त्याचा वापर कशासाठी करतात याची माहिती शिक्षक देतात.

**विचार करा :** एखाद्या वेळेस पाटबंधारे योजना नसत्या तर काय झाले असते? वर्गात चर्चा करा.

गट चर्चा करण्यास संधी द्या आणि प्रसंगानुसार जोडून परिणामांची यादी तयार करा. पाण्याच्या नियोजनासाठी सल्ला देण्याची संधी द्या. नदी आंतरजोड विषयी समजवा. त्याच्या फायदे आणि तोट्यांविषयी चर्चा करा.

**अध्ययन पत्रक 13 :**

कृती 1:- सध्या दाखले कोण संग्रह करुन ठेवतो? त्याचा काय उपयोग? याविषयी चर्चा करा. स्थानिक तलाठी, पी.डी.ओ. यांना शाळेत बोलावून याविषयी चर्चा करुन, भू-दाखल्याचे महत्त्व आणि अर्थ समजावून घेतात.

कृती 2:- आपल्या पालकांसोबत त्यांच्या संपत्तीचा दाखला कसा तयार करतात, त्याची चर्चा करा. पालकांसोबतची चर्चा वर्गांमध्ये सांगा.

कृती 3:- शिक्षक तुम्हाला एक भूदाखला देतात ते पाहून त्यात असणाऱ्या प्रमुख अंशाची यादी करा. कोणत्यातरी एका भू दाखल्याची नक्कल प्रत मुलांना द्या आणि दाखवल्यावर लक्ष देण्यासारखे अंशाविषयी माहिती देणे. उदाहरणार्थ - स्थळ, मालकाचे नाव, एकूण आकार किती आहे.

**मूल्यमापन :** अध्ययन पत्रक 10 चे कृती 3 म्हणून मूल्यमापन करावे.

# अध्ययन घटक 7 : सामाजिक, धार्मिक परिस्थिती

**अध्ययन निष्पत्ती : मध्ययुगात सामाजिक, धार्मिक झालेले बदल जाणून घेणे.**

**उद्दिष्टे :** * सामाजिक आणि धार्मिक सुधारणेस कारणीभूत भक्ती आणि सुफी संतांविषयी समजून घेणे.
* भक्ती आणि सुफी संतांची तत्त्वे आणि आदर्श पध्दती समजून घेणे. सामाजिक धार्मिक बदलांचे निरीक्षण करणे.

**अध्ययन पत्रक 14 :**

कृती 1:- सुफी संतांनी समाजातील कोणकोणत्या वाईट चालीरिती बदलण्याचे प्रयत्न केले, त्याची यादी करा. मुलांनी केलेली यादी, त्यातील अंश यांच्या आधारे बाजच्या काळातील सामाजिक दोष याविषयी सांगून त्यावर उपाय याविषयी मुलांचे अभिप्राय संग्रहित करुन मुलांच्यात तुलनात्मक अध्ययनाची मनोभावना वाढविणे.

कृती 2:- खाली दिलेली चित्रे सुफी संतांच्या संबंधित आहेत. तुम्ही त्यांचे स्थळ आणि माहिती समजून घेऊन तुमच्या मित्रांबरोबर चर्चा करा . नकाशाच्या सहाय्याने स्थळे आणि त्यांचा इतिहास माहित होईल असे पाहणे. तसेच इतर अध्ययनासाठी शाळेमध्ये ही कृती करता येईल.

कृती 3:- खाली दिलेल्या चित्रांचे सूक्ष्म निरीक्षण करुन उत्तरे द्या. चित्रा आधारे इतिहास समजावण्याचे प्रयत्न करणे. यासाठी आणखीन काही चित्रांचा वापर करणे. इतर अध्ययन कार्यासाठी या चित्रांचा वापर करु शकता. चित्र बघून इतिहास निर्माण करण्याची कृती करता येईल.

कृती 4:- खालील यादीत भक्तीपंथातील द्रष्टे आणि त्यांनी प्रतिपादन केलेली तत्त्वे दिली आहेत. त्यांच्या योग्य जोड्या लावा आणि लिहा.

कृती 5:- संतांनी दिलेल्या तत्त्वाविषयी तुम्हाला काय समजले ते सांगाल काय? समजून घेतलेल्या तत्त्वांचा अर्थ समजावून घेण्याचा प्रयत्न करणे. सर्वांचे तत्त्वज्ञान वेगवेगळे असले तरी त्यांचा मुख्य उद्देश समाजसुधारणा हा होता. ही मनोभावना मुलांच्यात रुजवावी.

**मूल्यमापन :**

अध्ययन पत्रक चौदा चे कृती पाच मूल्यमापनासाठी धरावे.

# अध्ययन घटक 8 : युध्दाची कारणे आणि परिणाम

**अध्ययन निष्पत्ती : युध्दाची कारणे आणि परिणाम समजून घेतात.**

**उद्दिष्टे :** * राजघराण्यांमध्ये होणाऱ्या युध्दाची कारणे आणि परिणाम समजून घेणे.
* युध्दामुळे झालेले बदल समजून घेणे.
* मध्ययुगात राजघराण्यात होणारे युध्द आणि आता होणारे युध्द यांची तुलना करणे.

**अध्ययन पत्रक 15 :**

कृती 1:- आता तुम्ही माहिती वाचली त्या आधारे खालील चित्रे पाहून विचार करुन उत्तरे द्या.

चित्र पाहिल्यानंतर राजघराण्यातील युध्द आणि आताचे युध्द याविषयी मुलांना पूर्वज्ञान आहे किंवा नाही हे समजून घेऊन, चित्रांच्या सहाय्याने युध्दाचे परिणाम स्पष्ट करणे. याला संबंधित पहिले, दुसरे महायुध्द, सध्या झालेले युध्दाचे व्हिडिओ दाखवून मुलांचे अभिप्राय संग्रह करुन त्यातील वास्तविकता मुलांना सांगून दोन्ही काळातील युध्दातील फरकांचा तुलनात्मक अभ्यास करण्यास प्रवृत्त करणे .

कृती 2:- मुलांनो, पुस्तकात असणाऱ्या नकाशाच्या सहाय्याने, भारतीय नकाशावर अल्लाउद्दीन खिलजीने दक्षिण भारतावर केलेले आक्रमण आणि त्याचे मार्ग व स्थळ शोधा. नकाशाच्या कृती सहाय्याने अल्लाउद्दीन खिलजी याचे आक्रमण आणि इतिहास समजावणे.

कृती 3:- बाबराने पानिपत युध्दामध्ये त्याच्या सैन्यापेक्षा जास्त सैन्य असलेल्या हेमुला हरविले यावर चर्चा करा.

सैन्य दलाविषयी माहिती देणे आणि मुलांच्या अभिप्रायांना जास्त महत्त्व देऊन युध्दाची वास्तविकता मुलांना सांगणे.

कृती 4:- विजयनगर पतनास कारणीभूत ताळीकोटी युध्द यावर टिपा लिहा. हा नमुना पुढे ठेवून राजघराणे किंवा कोणत्याही राज्याच्या पतनास युध्द एक कारण आहे हे समजावणे.

कृती 5:- युध्द होण्याची कारणे कोणती? ते कसे रोखता येईल? याबाबत तुमचे अभिप्राय सांगा. राज्याचा विस्तार, साधनसंपत्ती, नायकांचा निर्धार ही युध्दाची कारणे आहेत, हे मुलांना समजावून युध्दाला पर्यायी मार्ग, शांतिपूर्ण वार्तालाप, सामंजस्य, आप आपसात सहकार असे मुख्य अंश सांगून, ह्या भावना मुलांच्यात बिंबविणे.

**मूल्यमापन :**

अध्ययन पत्रक 15 तील कृती 1 आणि 5 मूल्यमापन कृती म्हणून ग्राह्य धरावे.

# अध्ययन घटक 9 : जलमार्गाचा शोध

**अध्ययन निष्पत्ती : समुद्र मार्गाच्या शोधास कारणीभूत घटक समजून घेणे.**

**उद्दिष्टे :-** * नवीन जलमार्ग शोधाची प्रमुख कारणे कोणती? ते समजावून घेणे.

* जलमार्ग शोधांमुळे झालेले परिणाम समजून घेणे. खादी कापड आणि मसाले पदार्थ यावर बोलून मुलांना प्रसन्न करणे आणि मुलांना वाचून अर्थ ग्रहण करण्यास संधी प्राप्त करुन देणे.

**अध्ययन पत्रक 16 :**

कृती 1 :- वरील संभाषण ऐकलात होय ना? तर खालील प्रश्नांची उत्तरे देऊया. खादी कपडे आणि मसाले पदार्थावरील संभाषणामुळे मुलांना जलमार्गाचे शोध लावण्याचे कारण काय? हे समजावण्याचे प्रयत्न केले पाहिजे. या कृतीत दिलेले उपप्रश्न विचारुन मुलांना युरोपियन जलमार्ग शोधण्यास पुढे का आले? याचे कारण व मुख्य अंश समजावून देणे.

कृती 2:- आज भारतातून दुसऱ्या देशाला होणाऱ्या आयात, निर्यात वस्तूंची यादी करा.

भारताची विदेशी बाजारपेठेतील आजची स्थिती, आयात, निर्यात वस्तू यामुळे विदेशी व्यापारी संबंध वाढविण्यासाठी आर्थिक क्रिया, उद्योग निर्मिती अशा घटकांवर प्रकाश टाकून मुलांना वाचून अर्थ समजून घेण्यास संधी देणे आणि जलमार्गाचा शोध कसा लागला हे समजावून देणे.

**अध्ययनपत्रक 17**

कृती 1:- वरील गोष्ट वाचून विचार करुन खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

स्ववाचन करुन स्वत: अर्थ ग्रहणास महत्त्व देऊन त्यालाच प्रश्नांची उत्तरे देण्यास प्रेरणा देणे. देशावर अवलंबित व्यक्तीचा व्यवसाय किंवा व्यापार याला धोका निर्माण झाल्यास, त्यामुळे होणारे परिणाम याचे अर्थ ग्रहण करणे आणि आपल्या दैनंदिन जीवनात किंवा अवतीभवती असे प्रसंग उभे राहिल्यास मुलांचे अभिप्राय संगह करुन, उदाहरणे मुलांना देणे. युरोपियनांचे भारत आणि आशिया देशातील वस्तूंवर असणारा मोह, त्यांची गरज आणि त्याचा परिणाम स्पष्ट करणे. कॉन्स्टॅन्टिनोपल शहर ताब्यात घेतलेले कथन करुन नकाशा वापरुन स्पष्टीकरण देणे.

**अध्ययन पत्रक 18 :**

कृती 1:- जगाच्या नकाशामध्ये खालील स्थळे शोधूया.

कृती 2:- दिलेल्या नकाशामध्ये वास्को द गामा भारतात आलेला मार्ग रेषा मारुन दाखवा. मुलांना नकाशा कृती करुन, उत्तर भारतातून इतर देशाशी असलेले जलमार्ग आणि भू- मार्गाचा परिचय देऊन, मुलांना जास्तीचे मार्ग शोधण्यास प्रोत्साहन देणे.

अध्ययन पत्रक 15 मध्ये दिलेले घटक वापरावे, रस्ते मार्ग आणि जलमार्गाचे वेगळे नकाशे वापरावेत.

कृती 3:- खाली काही स्थळांची जुनी नांवे दिली आहेत. त्यांची आजची नवीन नांवे शोधून सांगाल का? कालानुसार संदर्भानुसार काही स्थळांची नांवे बदलतात हे स्पष्ट करणे. उदाहरणार्थ - म्हैसूर संस्थानाचे कर्नाटक असे नाव बदललेले आहे हे सांगावे. आपल्या गावाला मागे एखादे नाव असल्यास त्याचा इतिहास परिचय करुन घेणे.

कृती 4:- रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा. आता समजलेल्या माहितीच्या आधारे विद्यार्थी आकलन झाल्याचे समजून घेणे.

**मूल्यमापन :**अध्ययन पत्रक सतरा चे कृती एक आणि अध्ययनपत्रक अठरातील कृती एक मूल्यमापन कृती म्हणून ग्राह्य धरावे.

# अध्ययन घटक 10 : ईस्ट इंडिया कंपनी प्रशासनाचा विस्तार

**अध्ययन निष्पत्ती : ईस्ट इंडिया कंपनीने आपले संपूर्ण भारतावर नियंत्रण केले याचे विवरण करणे.**

**उद्दिष्टे :**ईस्ट इंडिया कंपनीने आपली सत्ता उत्तरोत्तर कशी भारतभर विस्तारित केली हे समजून घेणे.

**अध्ययन पत्रक 19 :**

कृती 1:- खाली काही प्रमुख घटना दिल्या आहेत त्याला योग्य कारण देऊन त्याचे परिणाम सांगा.

पाठ्यपुस्तकाच्या सहाय्याने ईस्ट इंडिया कंपनी विस्तारास कारण ठरलेल्या प्रमुख लढाया, त्याची कारणे आणि परिणाम स्वत: शोधण्यास मुलांना मार्गदर्शन करणे.

कृती 2:- अत्यंत प्रबळ असणारे नवाब, मराठे, म्हैसूर राजे आणि शीख लोकांना सहज पराभूत करण्याची कारण शोधून लिहूया.

बलाढ्य सैन्य असून देखील भारताचे राजघराणे ईस्ट इंडिया कंपनीपुढे सहज हरले, हे मुलांना सांगताना ब्रिटिशांचे फोडा आणि राज्य करा याविषयी माहिती देऊन तसेच भारतीय राजांबरोबर आपापसातील वैमनस्य देखील ईस्ट इंडिया कंपनीला राज्य जिंकण्यास कारण ठरले, हे स्पष्ट करणे. हे सर्व त्यांच्या विस्ताराला कसे कारणीभूत ठरले हे समजावणे.

कृती 3:- विसाव्या शतकातील कोणत्याही एका युध्दाची माहिती संग्रह करुन त्याचे कारण आणि परिणाम लिहा. मुलांना भूतकाळातील युध्दाची माहिती असल्याने आजच्या युध्दाबद्दल वृत्तपत्रे, टि.व्ही., इंटरनेट अशा माध्यमापासून मिळालेली माहिती संग्रहित करुन उत्तरे लिहिण्यास प्रेरणा देणे. सध्या चालू असलेल्या रशिया आणि उक्रेन मधील युध्दाचे व्हिडिओ दृश्य दाखवून युध्दामुळे होणारे परिणाम याविषयी चर्चा करावी.

**मूल्यमापन :** अध्ययन पत्रक एकोणीसचे कृती दोन मूल्यमापनास ग्राह्य धरावे.

# अध्ययन घटक 11 : ब्रिटिश राजवटीचा शेतीवर झालेला परिणाम

**अध्ययन निष्पत्ती : कृषी क्षेत्रावर ब्रिटिश राजवटीचा परिणाम याचे विश्लेषण करणे.**

**उद्दिष्टे :**ब्रिटिश राजवटीचा कृषी क्षेत्रावर झालेले परिणाम. करार पध्दतीमुळे शेतकऱ्यांचे शोषण कसे होते, हे समजून घेणे. आजच्या प्रशासनामध्ये कृषी क्षेत्रावर असणारे कर पध्दती समजूनद घेणे.

**अध्ययन पत्रक 20 :**

कृती 1 :- समानता आणि फरक ओळखणे. रयतवारी, जमीनदारी आणि महालवारी पध्दतीमध्ये असणारे समानता आणि असमानता यांची यादी करुया. ब्रिटिश राजवटीत असणाऱ्या विविध पध्दतीच्या कृषी नीतीचा परिचय करुन देऊन मुलांकडून समानता व असमानता यांची यादी करुन घेणे.

कृती 2:- दिलेल्या भारताच्या नकाशात मद्रास, बंगाल आणि मध्य भारताचे प्रांत ओळखणे. नकाशाची कृती करुन घेणे आणि स्थळ शोधून मुलांना मार्गदर्शन करणे. याआधी असणाऱ्या भारताच्या नकाशात ब्रिटिश राजवटी पाहण्यास संधी देणे.

कृती 3:- शिक्षकांची मदत घेऊन नमुना पाहून दिलेल्या प्रश्नांना उत्तरे शोधून लिहा. तुम्हाला शक्य असलेला कोणताही एक नक्कल भू दाखला मुलांना द्या. दाखल्यात प्रामुख्याने कोणत्या गोष्टी पहाव्यात हे मुलांना समजावून द्यावे. उदाहरणार्थ, मालकाचे नाव, स्थळ, कालावधी,

कृती 4:- तुमच्या कुटुंबातील व्यक्ती, शेतकरी किंवा ग्रामसेवकांना भेट देऊन विविध दाखल्यांची नांवे संग्रहित करुन यादी करा. मुलांना शेतकरी, ग्रामसेवक, पी.डी.ओ. यांना भेटण्याची संधी देणे, जेथे नाहीत तेथे विविध दाखले विषयी माहिती असणारे कोणतेही एका अधिकाऱ्यास शाळेत बोलावून भू दाखल्याविषयी मुलांबरोबर चर्चा करण्याची संधी उपलब्ध करुन देणे.

कृती 5:- आजकाल शेतकरी आत्महत्या करीत असून त्याची माहिती माध्यमातून येते. यासंबंधी कोणातरी एका शेतकऱ्याला भेटून त्याची माहिती घेऊन, आत्महत्या थांबविण्यासाठी वेगवेगळे उपाय सूचवा.

* शेतकऱ्याना भेटी देऊन शेतकरी आत्महत्या संबंधी माहिती संग्रह करण्यास संधी देऊन किंवा स्थळीय शेतकऱ्यांबरोबर संवाद ठेवून मुलांना चर्चेच्या आधारे आपले अभिप्राय लिहिण्यास मार्गदर्शन करणे.

कृती 6:- एखाद्यावेळेस ब्रिटिश काळात तू शेतकरी असता तर काय केले असते? तुझे स्वत:चे मत सांग. या अध्ययन घटकाची माहिती चर्चेच्या आधारावर शेतकऱ्यासाठी मुलांना तर्क आणि चिंतन करण्यास मुक्तता देणे.

**मूल्यमापन :**अध्ययन पत्रक वीस चे कृती एक आणि पाच मूल्यमापनासाठी विचार करा.

## अध्ययन घटक 12 : भारताचे पहिले स्वातंत्र्य युध्द आणि ब्रिटिश राजवटीच्या सुधारणा

**अध्ययन निष्पत्ती :**

ब्रिटिश राजवटीच्या सुधारणा आणि भारतीयांची प्रतिक्रिया याचे विश्लेषण करणे.

**उद्दिष्टे :**भारताच्या पहिल्या स्वातंत्र्य संग्रामाची कारणे समजून घेणे. पहिल्या स्वातंत्र्यलढ्यानंतर झालेला बदल समजणे.

**अध्ययन पत्रक 21 :**

कृती 1:- पाठ्यपुस्तकात भारताच्या पहिल्या स्वातंत्र्य लढ्याविषयी समजून घेतलं ना? असे असल्यास याच्या आधारे वर दिलेल्या रिकाम्या जागेत एक लहान कथा लिहूया.

पहिल्या स्वातंत्र्यलढ्याच्या माहितीच्या आधारावर मुले स्वत: कथा लिहितील अशी प्रेरणा देणे. त्यांना आवश्यक मार्गदर्शन करणे.

कृती 2:- पहिल्या स्वातंत्र्यलढ्यात तुला आवडलेले घटक कोणते? आणि का? तुझे मत वर्गात सर्वांना सांगून त्यावर चर्चा करा आणि एकमेकांना आवडलेल्या घटना, या का आवडल्या? असे प्रश्न विचारुन मुलांचे अभिप्राय घेऊन त्यांचा गौरव करा आणि भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचे वास्तव स्पष्ट करा.

कृती 3:- भारतात ब्रिटिशांनी केलेल्या सुधारणा आणि त्याला संबंधित काही प्रमुख बदल दिले आहेत, ते योग्य जागी जुळवून लिहा.

लिहिण्यास शिक्षकांनी योग्य मार्गदर्शन करावे आणि प्रत्येक सुधारणा मुलांच्या बरोबर माहिती देत चर्चा करा. त्यांनी केलेल्या सुधारणा आज देखील अस्तित्वात आहेत हे सांगावे आणि तुम्हाला कोणती सुधारणा आवडली? आणि का ? हे सांगण्यास संधी द्यावी. शेवटी तेव्हाच्या सुधारणा आणि त्यांचे परिणाम याविषयी एकत्रीकरण करावे.

**अध्ययन पत्रक 22 :**

कृती 1:- खाली दिलेल्या यादीतील जहालवादी आणि मवाळवादी ओळखून वेगळे करुन लिहा.

कृती 2:- स्वातंत्र्यलढ्यामध्ये जहाल आणि मवाळ यांच्या लढ्यामूळे झालेला बदल आणि सुधारणा यांची पाठ्यपुस्तकाच्या सहाय्याने यादी तयार करा.

कृती 3:- जहाल आणि मवाळ या दोघांचे उद्देश स्वातंत्र्य मिळवणे हेच होते, असे असले तरी दोघे वेगवेगळ्या प्रकारे का लढा दिला? विचार करा आणि वर्गामध्ये शिक्षकांच्या सहाय्याने चर्चा, स्पर्धा आयोजित करुन भारताला कोणता मार्ग चांगला ते सांगा.

कृती 4:- सध्या भारतामध्ये झालेला कोणताही एक लढा किंवा बंद, चळवळ, आंदोलन या विषयी माहिती संग्रहित करा आणि त्याचे उद्देश आणि परिणाम लिहून तुमचा अभिप्राय सांगा.

**मूल्यमापन :**

अध्ययन पत्रक एकवीस मधील कृती एक आणि अध्ययनपत्रक बावीस मधील कृती तीन मूल्यमापन कृतीसाठी विचारात घ्या.

# अध्ययन घटक 13 : सामाजिक आणि धार्मिक सुधारणा

**अध्ययन निष्पत्ती :**

ब्रिटिशांच्या राजवटीत भारतातील समाजसुधारक आणि धार्मिक सुधारक यांच्या विषयी समजून घेणे.

**उद्दिष्टे :** * ब्रिटिश कालीन सामाजिक आणि धार्मिक वाईट चालीरिती समजणे.

* समाज आणि धार्मिक सुधारकांचे कार्य आणि सुधारणांचा अर्थ समजून घेणे.
* आताच्या दिवसांमध्ये सामाजिक आणि धार्मिक वाईट चालीरिती विषयीमआपापसात चर्चा करणे.

**अध्ययन पत्रक 23 :**

कृती 1:- खाली दिलेल्या रिकाम्या जागेत ब्रिटिशकालीन समाजसुधारकांची चित्रे संग्रह करुन चिकटवा व नांवे लिहा.

चित्रे संग्रह करण्यास वेळ देणे. याचबरोबर पुस्तकांच्या सहाय्याने मुलांना माहिती घेण्यास उत्तेजन देणे. तसेच गट करुन प्रत्येक गटाकडून एकेका विषयी अभिप्राय देण्यास वेळ आणि संधी देणे.

कृती 2:- खाली काही समाजसुधारकांना संबंधित त्यांनी स्थापन केलेल्या संस्थांची नांवे दिली आहेत, ते कोणत्या समाजसुधारकांशी संबंधित आहेत, त्यांची प्रमुख तत्त्वे कोणती ? त्या तत्त्वांचा आता कसा उपयोग होत आहे ? हे समजून देणे आणि मुलांना तार्किक विचार करुन त्या तत्त्वांचे पालन करुन आदर्श कसा घ्यायचा, ह्याचा मुलांना विचार करण्यास सांगणे.

कृती 3:- मुलांनो, आजच्या काळात आपल्या अवतीभवती अनेक सामाजिक, धार्मिक, राजकीय आणि इतर क्षेत्रात सुधारणा आणण्यासाठी अनेक संस्था कार्यरत आहेत, अशा संस्थांची, संघटनांची माहिती घेऊन कोणत्याही पाच प्रमुख संस्थांची किंवा संघटनांची नांवे लिहून, त्यांचे प्रमुख उद्देश लिहा. सामाजिक आणि धार्मिक चालीरिती किंवा अंधश्रध्दा या सर्व काळात अस्तित्वात आहेत, हे सांगून त्यांच्या निमूर्लनासाठी कार्यरत स्वयंसेवी संस्थांचा परिचय करुन देणे.

**मूल्यमापन :** अध्ययन पत्रक वीस ची कृती दोन, मूल्यमापन कृतीसाठी विचारात घ्या.

# अध्ययन घटक 14 : गांधीयुग

**अध्ययन निष्पत्ती : स्वातंत्र्यचळवळीत गांधीजींचे मार्ग समजून घेणे.**

**उद्दिष्टे :**

* स्वातंत्र्यचळवळीत गांधीजींचा सहभाग याचे विश्लेषण करणे.

* गांधीजींच्या सत्य आणि अहिंसा मार्गाचे स्वातंत्र्यचळवळीत कसा प्रभाव पडला हे समजून घेऊन स्वत:च्या जीवनात त्याचा वापर करण्याचा प्रयत्न करणे.

* स्वातंत्र्यचळवळीत गांधीजींचे योगदान फार महत्वाचे असून सत्य आणि अहिंसा या दोन अस्त्रांचा स्वातंत्र्य चळवळीत वापर झाला. गांधीजींचे जीवन, आंदोलन म्हणून घेणे एवढेच नसून त्यांचा आदर्श आपण घेणे आणि त्यानुसार आचरण करणे हा अध्ययन निष्पत्तीचा हेतू आहे.

**अध्ययन पत्रक 24:**

कृती 1:- स्वातंत्र्यचळवळीत गांधीजींनी अहिंसेचा मार्ग स्वीकारण्याचे कारण काय? हे ऐकून, समजून घेऊन तुझा अभिप्राय सांग.

गांधीजी आणि सन्मार्ग निवडण्याची कारणे, प्रसंग, घटना समजावून देणे आणि मुलांचे अभिप्राय याच्या आधारे चर्चा करुन अहिंसा मार्गाचे महत्त्व सांगणे.

कृती 2:- भारताच्या स्वातंत्र्यप्राप्ती मध्ये खाली दिलेल्या चळवळीचे काय महत्त्व आहे ते सांगाल का? या कृतीनंतर असहकार आणि कायदा भंग चळवळ या तंत्राविषयी विश्लेषण करुन आजच्या आंदोलनामध्ये या तंत्राचा किती उपयोग होतो? याची चर्चा करणे.

कृती 3:- भारताच्या स्वातंत्र्यलढ्यामध्ये भाग घेतलेले कर्नाटकातील प्रमुख व्यक्तींचे चित्रसंग्रह करुन रिकाम्या जागेत चिकटवा आणि शिक्षकांच्या सहाय्याने त्यांच्या लढ्याचे इतिहास संक्षिप्त लिहून तक्ता तयार करुन चिकटवा. स्वातंत्र्यलढ्यात विविध प्रांतातील नेते भाग घेतल्याचे समजून घेऊन त्यांच्या विषयी चित्रासहित माहितीचे तक्ते करुन इतिहास समजावून देणे. त्यांच्याबरोबर लक्षांवधी लोक लढ्यात कसे सहभागी झाले ते समजावणे. येथे गांधीजींचे जीवन चरित्र मुलांना व्हिडिओ लावून दाखविणे. आताच्या चळवळीपेक्षा गांधीजींच्या चळवळी किती प्रभावी होत्या ते सांगणे.

**मूल्यमापन :**

अध्ययन पत्रक चौवीस चे कृती दोन मूल्यमापन कृती म्हणून विचारात घ्यावी.

# अध्ययन घटक 15 : कर्नाटक एकीकरण आणि सीमावाद

**अध्ययन निष्पत्ती : कर्नाटक एकीकरण चळवळ आणि सीमावादाविषयी समजून घेणे.**

**उद्दिष्टे :** * आजच्या कर्नाटक निर्मितीमध्ये कोणत्या चळवळी झाल्या, त्याचा इतिहास समजून घेणे.

* सीमावाद शांततेने सोडविण्याची मनोभावना विद्यार्थ्यांमध्ये वाढविणे. कर्नाटकची भाषेच्या आधारावर निर्मिती झाली असली तरी उद्योग अथवा इतर कारणामुळे कर्नाटकात अजून विविध धर्माचे, भाषेचे लोक राहतात. कन्नड भाषिक देखील विविध राज्यात राहतात. त्यामुळे भाषेवरुन संघर्ष न करता शांतीयुक्त आणि सहकार पध्दतीने संविधानाचा हेतू समानता, स्वातंत्र्य, बंधुभाव याचा वापर करणे महत्त्वाचे आहे आणि यालाच महत्त्व द्यावे.

**अध्ययन पत्रक 25 :**

कृती 1:- कर्नाटक एकीकरण चळवळीमध्ये भाग घेतलेल्या प्रमुख व्यक्ती आणि संघ, संस्थांची यादी करणे, कर्नाटकात असणाऱ्या भाषा संघटनांची यादी करुन भाषा रक्षणासाठी ह्या संघटना करीत असलेले कार्य याविषयी मुलांसोबत चर्चा करणे.

कृती 2:- कर्नाटक एकीकरण चळवळीची एक गोष्ट तयार करा.

पाठ्यपुस्तकाच्या सहाय्याने मुले स्वत: गोष्ट लिहितील याची प्रेरणा देऊन गोष्टीचा प्रारंभ कसा करावा, ते पुढे कसे लिहावे आणि शेवट कसा करावाया याचे मार्गदर्शन करणे.

कृती 3:- भारताच्या नकाशात 1956 च्या अगोदर मुंबई, मद्रास, म्हैसूर, हैदराबाद आणि कोडगू हे प्रांत दाखवा. नकाशा कृतीत स्थान दाखविण्यास मदत करणे. 1956 च्या अगोदर आणि नंतर, आताचा कर्नाटक नकाशा वापरुन त्यात झालेला बदल ओळखा.

कृती 4:-कर्नाटक राज्याची सीमा आणि सीमावाद असणाऱ्या राज्यांची यादी करा आणि मित्रांबरोबर भारताच्या नकाशात दाखवा. भारतीय नकाशात विविध राज्यांचे सीमावाद शोधून समस्येची कारणे आणि परिणामांविषयी चर्चा करणे.

कृती 5:- शिक्षक आणि कुटुंबातील लोकांशी चर्चा करुन सीमावाद सोडवण्यासाठी तू सल्ला दे, सीमावाद सोडविण्याचे उपाय, मार्ग याविषयी चर्चा करा. शांतीमार्गाने, मुक्त संवादाने सोडविण्यासाठी प्रयत्न करणे.

**मूल्यमापन :**

अध्ययन पत्रक पंचवीस मधील कृती दोन आणि चार मूल्यमापनासाठी ग्राह्य धरावी.

# भूगोल

## अध्ययन घटक 16 : दिशा

**अध्ययन निष्पत्ती : दिशा ओळखून दैनंदिन जीवनात त्याचा वापर करतात.**

**उद्दिष्टे :** दिशा ओळखून दैनंदिन जीवनात वापर करणे.

**अध्ययन साहित्य :** नकाशे आणि दिशादर्शक

**प्रक्रिया :**

शिक्षक दिशा विषयी प्रश्न विचारुन मुलांचे पूर्वज्ञान ओळखतात. नंतर दिशा ओळखण्याच्या सोप्या पध्दती कृतीद्वारे सांगून त्या दिशांचा परिचय करुन देतात. मुले दिशा खेळ खेळतात आणि नकाशे वापरुन स्थळ सांगून दिशा ओळखण्यास सांगतात. शाळा आणि त्याच्या घराभोवतालच्या स्थळांची दिशा ओळखण्यास सांगतात आणि महत्त्व समजावून घेतात.

**अध्ययन पत्रक 26 :**

कृती 1:- दिशांबद्दल तुम्ही समजलात ना, तर सांगा बघू तुम्हाला किती माहित आहे? मुलांचे पूर्वज्ञान समजून घेणे ही कृती उद्देशीत असून, मुलांना प्रश्न विचारुन उत्तर मिळवूया.

कृती 2:- दिशा ओळखू या. चित्र निरीक्षण करण्यास सांगणे, नंतर त्यावर प्रश्न विचारणे, दिशा समजून घेण्यास संधी देणे.

कृती 3:- दिशांचा खेळ खेळूया. मुलांना सुचनेनुसार चित्र बघून खेळ खेळण्यास सांगणे आणि शाळेच्या मैदानावर हाच खेळ खेळणे.

**अध्ययन पत्रक 27 :**

कृती 1:- दिशादर्शकाबरोबर खेळ खेळूया.

मुलांना दिशादर्शकाची माहिती देणे आणि त्याचा वापर करुन दिशा ओळखण्यास सांगणे. दिशादर्शकाच्या सहाय्याने शाळेचे विविध भाग शोधणे किंवा ओळखणे. गरज असेल तेथे मार्गदर्शन करावे. दिशादर्शकाचे महत्व यावर चर्चा करणे.

कृती 2:- नकाशावर दिशा ओळखू या आणि प्रश्नांची उत्तरे देऊया. (भारताचा नकाशा वापरणे) राजकीय नकाशा जमिनीवर ठेवून सांगितलेल्या दिशा सांगितलेल्या कृतीप्रमाणे ओळखण्यास संधी देणे. दैनंदिन जीवनात दिशांच्या महत्त्वाविषयी चर्चा करुन समजावून सांगणे. अशा रीतीने तुमचे गाव, तालुका, जिल्हा यांचे नकाशे वापरुन तुमच्या मित्राबरोबर दिशांचे खेळ खेळत आणखीन जास्तीत जास्त माहिती घेण्याची संधी उपलब्ध करुन देणे.

कृती 3:-याविषयी समजून घ्या : बांधकाम करताना लोक दिशा विषयी जास्त लक्ष देतात हे मुलांना सांगून उत्तरे शोधण्यास सांगा. नंतर त्यामागील इतिहास, वैज्ञानिक कारणे मुलांना स्पष्ट करा.

**मूल्यमापन :**

अध्ययन पत्रक सव्वीसच्या कृती दोनचे मूल्यमापन कृती गृहीत धरावे.

# अध्ययन घटक 17 : नकाशे

**अध्ययन निष्पत्ती : नकाशा वाचन कौशल्य प्राप्त करुन नकाशे तयार करणे.**

**उद्दिष्टे :** * नकाशाच्या आवश्यकतेचे महत्त्व समजणे.

* नकाशांचे प्रकार आणि त्यांची विशेषता समजणे.

* नकाशा वाचन आणि निर्मिती कौशल्य प्राप्त करणे.

**प्रक्रिया :**

प्रथम शिक्षकांनी नकाशाविषयी काही प्रश्न विचारुन मुलांकडून प्रतिक्रिया घेऊन त्यांचे पूर्वज्ञान समजून घेणे. मुलांचे गट करुन त्यांना नकाशा द्यावे आणि घटक शोधण्यास सांगावे. सर्वांना संधी द्यावी नंतर नकाशाचा वापर करुन प्रश्न विचारत नकाशाची आवश्यकता आणि महत्त्व समजून घेण्यास संधी देणे. नंतर मुलांचे गट करुन वेगवेगळे नकाशे देऊन त्यांच्यात असणाऱ्या फरकांची यादी करण्यास सांगणे. त्यांनी केलेली यादी घेऊन नकाशांचे प्रकार सांगणे. कोणत्या नकाशातून कोणती माहिती घेता येते याच्या विषयी स्पष्टीकरण करुन, नकाशावाचन कौशल्य समजून घेणे. नकाशा तयार करण्याची कृती करुन घेणे. याला आवश्यक मार्गदर्शन करणे. भूगोलाच्या वर्गामध्ये नकाशा वापरणे फार गरजेचे आहे. नकाशा न वापरता भूगोलाचा वर्ग अपूर्ण आहे. असे समजावे.

**अध्ययन पत्रक 28 :**

कृती 1:-नकाशा पाहून यादी तयार करुया.

कृती 2:- नकाशा पाहून सांगूया. (भारताचा राजकीय नकाशा वापरुया)

नकाशातील प्रमुख घटकांची यादी करणे आणि ते काय काय सुचवितात हे समजून घेणे. मुलांकडून नकाशा तयार करुन घेताना, हे घटक न चुकता नोंद करण्याचा सराव करुन घेणे.

**अध्ययन पत्रक 29 :**

**कृती 1:**-नकाशाचे प्रकार समजून घेऊया.

मुलांचे गट तयार करुन विविध नकाशे देऊन त्यांच्यामध्ये असलेले फरक ओळखून सांगणे. नंतर त्यांच्यावर चर्चा करुन नकाशांचे प्रकार समजून घेणे. कोणत्या नकाशातून कोणती माहिती मिळवता येईल या विषयी स्पष्टीकरण देणे. नकाशाचे महत्त्व समजून शाळा ॲटलास, पाठ्यपुस्तकातील विविध नकाशे वापरुन ही कृती करुन घेणे. शाळा किंवा अटलास पुस्तकातील विविध नकाशांचा वापर करणे.

**सूचना :** महत्वाचे घटक- नकाशांचे शीर्षक, रंग, चिन्हे, स्केल इत्यादी.

कृती 2:- आपण नकाशे तयार करुया.

प्रत्येकाला दिलेल्या सूचनेनुसार कृती करण्यास सांगितले पाहिजे. आवश्यक तेथे मार्गदर्शन करावे. मुलांनी तयार केलेले नकाशे प्रदर्शित करुन त्यावर चर्चा करणे.

कृती 3:- नकाशा वापरुन तुम्ही तुमच्या शाळेचा किंवा गावाचा काल्पनिक नकाशा तयार करु शकता. वरील कृतींच्या आधारे मुलांना नकाशा तयार करण्यास सांगणे.

**मुल्यमापन :**

अध्ययन पत्रक एकोणतीसचे कृती क्रमांक एक आणि दोन मुल्यमापनासाठी घ्यावे.

# अध्ययन घटक 18 : खंड

**अध्ययन निष्पत्ती : जगाच्या नकाशामध्ये खंड आणि महासागर शोधणे. अक्षांश-रेखांश निर्देशांक वापरुन नकाशा अथवा अॅटलास मध्ये सर्व खंडांचे स्थान समजून घेणे.**

**उद्दिष्टे :** * नकाशाद्यारे भूखंड आणि सागर यांचे स्वरुप समजून घेणे.

* खंड व महासागर ओळखून प्रत्येकांची लक्षणे समजून घेणे.

* अक्षांश आणि रेखांश नसतील तर स्थान ओळखणे शक्य नाही हे समजून घेतात.

**अध्ययन पत्रक 30 :**

कृती 1:- आपण खंड, सागर, समुद्र हे समजून घेतले, आता जगाच्या नकाशावर ते कसे दाखवायचे? हे समजून घ्या.

कृती 2:- भिंतीवर अडकविलेल्या जगाच्या नकाशात भूखंड आणि सागर, मित्रांबरोबर शोधून सांगा.

या कृतीत मुलांना दिलेल्या नकाशात भूखंड, सागर, समुद्र शोधण्यास मदत करा. वर्गामध्ये मुलांना नकाशा देऊन गटागटामध्ये खंड आणि सागर शोधण्याचा खेळ घ्या. उदाहरणात गटात असणारा कोणीही एक विद्यार्थी युरोप खंड असे सांगितल्यास इतरांनी ते दाखवावे. असे प्रत्येक खंड, सागर आणि देश शोधण्याचे खेळ खेळून शोधण्यास मदत करणे.

कृती 3 :- दिलेल्या जगाच्या रिकाम्या नकाशात भूखंड काढून ते रंगवून त्याचे नाव लिहून द्या. मुलांना स्वत: कृती करण्यास सांगावे. या अध्ययन पत्रकात भूखंडाची रचना कशी झाली? ते कसे दूर गेले? याचे व्हिडिओ दाखवून परिचय करुन देणे.

**अध्ययन पत्रक 31 :**

**कृती 1** :- दिलेल्या नकाशात जगातील सात खंड आणि अक्षांश-रेखांश ओळखून लिहा.

**सूचना :** प्रत्येक खंड कोणत्या अक्षांश आणि रेखांशा पासून सुरु होऊन शेवट होते. ते शोधून लिहा. (पाठ्यपुस्तक किंवा शिक्षकांची मदत घ्या) अक्षांश आणि रेखांश ओळखून, यांच्याशिवाय स्थान निश्चित करण्यास किंवा शोधण्यास शक्य नाही. हे खात्री करुन घेणे याला संबंधित इतर देशांचे अक्षांश आणि रेखांश शोधून सांगण्याची कृती मुलांना देणे.

**कृती 2:-** आशिया खंडाच्या नकाशात भारत दाखवा, भारताच्या पूर्वेला असणारे दोन देश, पश्चिमेला असणारे दोन देश आणि उत्तरेला असणारे दोन देश व दक्षिणेकडील दोन देश दाखवून त्यांची नावे लिहा. दिशांचा परिचय मुलांना असल्याने स्वत: शोधण्यास सांगावे.

**मुल्यमापन :**

अध्ययन पत्रक एकतीसचे कृती एक हे मूल्यमापनासाठी विचारात घ्यावे.

# अध्ययन घटक 19 : हवामान

**अध्ययन निष्पत्ती : अक्षांश, रेखांश हे स्थान, हवामान आणि वनस्पती वर कसे परिणाम करतात ते सांगणे.**

**उद्दिष्टे :** * विविध स्थानांची तुलना करताना, प्रत्येकाचे अक्षांश आणि रेखांश स्थान तेथील हवामान, वनस्पती, प्राणी यांच्यावर कोणते प्रभाव पाडतात, ते आपल्या स्थानिक परिस्थितीनुसार समजून घेणे.

**अध्ययन पत्रक 32 :**

**कृती 1**:-दिलेल्या चित्रात अक्षांश आणि रेखांश दाखविले आहे. त्यांची नावे लिहून त्याविषयी समजून घेणे. पाठ्यपुस्तकाच्या सहाय्याने प्रमुख पाच अक्षांश, रेखांश ओळखण्यास मार्गदर्शन करणे.

कृती 2:-खाली दिलेल्या नकाशामध्ये अशांश, रेखांश ज्या खंडातून व देशातून गेलेत त्यांची यादी करा.

**सूचना :** मदतीसाठी पाठ्यपुस्तकातील नकाशे वापरा. खंड आणि देश ओळखण्याबरोबर त्या खंडाची, देशाची तेथील हवामान अक्षांश स्थानामुळे सहजपणे शोधता येईल.

कृती 3:- मुले स्वत: पृथ्वीवरील हवामान झोन ओळखून त्याला रंग लावून नावे लिहितात आणि त्यावरील खंड आणि देश समजून घेतात. स्थळीय प्रसंगाद्वारे सूर्यकिरणांच्या आधारावर क्षेत्र कसे आणि का करुन घेण्यात आले आहेत. हे मुलांना समजावून सांगणे तुम्ही राहत असलेल्या ठिकाणाचे हवामान आणि वातावरण कसे ठरविले आहेत ? हे सांगणे.

कृती 4:- मुलांना जगातील कांही देशांची नावे आणि त्यांचे तापमान यांची यादी दिली आहेत. एकाचवेळी सगळीकडे वेगळे तापमान असण्याचे कारण काय ? ऐकून समजून घ्या आणि वर्गात चर्चा करा. गट चर्चा करुन तापमानात बदल असण्याच्या कारणांची यादी करणे.

कृती 5:- मुलांनो प्रत्येक भूखंडावरील तिथल्या अक्षांश स्थानावरुन प्राणी आणि वनस्पतीमध्ये विविधता आढळून येते नाही का ? तसे असल्यास तुमच्या पाठ्यपुस्तकाच्या साहाय्याने तेथे असणाऱ्या प्रमुख प्राणी आणि वनस्पती यांची यादी करा. प्राणी वनस्पती यांची यादी करण्याबरोबर भूखंडामधील फरक समजून घ्या आणि दुसऱ्या भूखंडावर हे का आढळत नाहीत ? याचा अर्थ लावा. कर्नाटकात एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात गेल्यानंतर पिके, कपडे, आहार पध्दतीत फरक असण्याची कारणे शोधा. ही क्रिया योजना मुलांना देणे.

कृती 6:-अंटार्टिका खंडातील दिसणारे पेंग्विन पक्षी तुमच्या गावात आणून सोडल्यास काय होईल? विचार करुन उत्तरे द्या.

मुलांना उत्तरे देण्यास संधी द्या. नंतर पेंग्विन असलेल्या प्रदेशातील हवामान आणि वायु गुण यांचा परिचय करुन देणे. याच प्रकारे इतर प्राणी वर्ग आणि वनस्पती विषयी कृती करुन घेणे.

**मूल्यमापन :**

अध्ययन पत्रक बत्तीसच्या कृती क्रमांक पाच आणि सहा चे मुल्यमापन करा.

# अध्ययन घटक 20 : आशिया खंड

**अध्ययन निष्पत्ती : आशिया खंडाची प्रमुख वैशिष्ट्ये वाचा आणि समजून घ्या.**

**उद्दिष्टे :** खंड, वनस्पती, प्राणी, लोकसंख्या, उद्योग आणि इतर संसाधनाची स्थिती समजून घेणे. विविध खंडात आढळणाऱ्या देशांमधील विविधतेची कारणे समजून घेणे. आणि त्यांची इतर देशाशी किंवा त्याच्या परिस्थितीची तुलना करणे.

**अध्ययन पत्रक 33 :**

**कृती 1: -** वाचून समजून घ्या आणि राहिलेल्या सहा खंडाची माहिती संग्रह करुन पत्रक तयार करा. वरील अभ्यासातील खंड आधीच समजून घेतल्यावर तुम्ही मुलांना उर्वरित खंडासाठी त्याच किंवा इतर कोणत्याही स्वरुपात माहितीपत्रक तयार करण्यासाठी मार्गदर्शन करु शकता. मुलांचे सहा गटात विभाजन करा आणि प्रत्येक गटाला प्रत्येक खंडाबद्दल लिहायला सांगा. माहिती पत्रक पूर्ण वर्गाच्या भिंतीवर टांगा जेणेकरुन मुले इतर खंडांबद्दल स्वत: वाचून समजू शकतील. माहिती गोळा करणे आणि लिहिण्याचे कौशल्य सुधारेल.

**मूल्यमापन :**

शिक्षण पत्रक तीसच्या कृती क्रमांक एक मूल्यमापनासाठी विचारात घ्या.

# नागरिकशास्त्र
## अध्ययन घटक 21 : संविधानाची गरज

**अध्ययन निष्पत्ती : राज्यघटनेची गरज समजून घेणे. भारतीय संविधान सभा वाचा आणि जाणून घ्या. कर्नाटकातील प्रमुख व्यक्तींचा परिचय करुन घ्या.**

**उद्दिष्टे :*** संविधान हा देशाचा मूलभूत कायदा आहे. ज्याचे पालन प्रत्येकाने करणे आवश्यक आहे.

* घटना समिती आणि घटनेत सर्व वर्ग आणि प्रांतांना प्राधान्य दिले गेले आहे हे समजून घेणे.
* प्रस्तावनेतील ठळक वैशिष्ट्ये सूचिबध्द करुन ती मुलांच्या दैनंदिन जीवनात समाविष्ट करा.

**अध्ययन पत्रक 34 :**

**कृती 1:** चला कथा वाचून उत्तरे देऊया.

कथेवर आधारीत प्रश्नांची उत्तरे दिल्यानंतर, असा आभास निर्माण झाला पाहिजे की, शांततामय समाजासाठी घटनात्मक सरकार आवश्यक आहे आणि आपण सर्व त्याचा आदर करतो आणि पालन करतो. विपरीत घडले तर काय होईल?

**अध्ययन पत्रक 35 :**

कृती 1:- संविधान सभेला उपस्थित राहिलेल्या कर्नाटकातील प्रमुख व्यक्तींची चित्रे दिली आहेत. त्यांच्या बद्दल माहिती मिळवा कर्नाटकातून सहभागी झालेल्या सदस्यांचा परिचय सांगा. संविधान सभेतील व्यक्ती वेगवेगळया प्रांतातून निवडून आल्या होत्या.

कृती 2:- मुलांनो तुमच्या शाळेत शालेय मंत्रिमंडळाच्या सहाय्याने तुमच्या शाळेचे नियम तुम्हीच तयार करा आणि शाळेच्या सूचनाफलकावर लावा.

शाळेच्या पहिल्या दिवशी मुख्याध्यापक, शिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व मुलांच्या उपस्थितीत, त्यांच्या शाळेसाठी नियम तयार करण्यासाठी शालेय मंत्री मंडळाची बैठक आयोजित करतात आणि सदस्यांनी सुचविलेल्या मुद्यांची यादी करतात आणि सर्वांसमोर वाचून सूचनाफलकावर लावतात. इतर मुलांना नियम वाचून सल्ला, सूचना देण्यास संधी देतात. दुसऱ्या दिवशी मंत्रिमंडळ त्यांच्या सल्ला, सूचना विषयी चर्चा करुन अंतिम यादी तयार करतात आणि त्या नियमांचे पालन करण्यास सांगतात. हे नियम केव्हापासून लागू होणार हे सांगतात. यासाठी शिक्षकांनी मार्गदर्शन करावे. कोणते नियम पाहिजे, कोणते नको ते सांगू नये. याला सरकारी प्राथमिक शाळा संविधान किंवा शाळा नियम असे शीर्षक द्यावे.

**अध्ययन पत्रक 36**

कृती 1:- आपण दररोज प्रार्थनेच्या वेळी भारताच्या संविधानाची प्रस्तावना वाचतो.यातून तुम्ही काय शिकलात सांगा?

रोज प्रार्थनेवेळी प्रस्तावना वाचून घेणे व दररोज एका विद्यार्थ्याला पुढे बोलावून एक एक ओळीचे अर्थ सांगण्यास लावणे आणि त्याला त्या विषयावर सविस्तर बोलण्यास सांगणे. उदाहरणार्थ आम्ही भारतीय प्रजासत्ताक, समाजवादी, सर्व धर्म समभाव, स्वातंत्र्य, समानता इत्यादी हे सर्व विद्यार्थ्यांसमोर घ्यावे. यामुळे संविधानाची मुल्ये त्यांचा परिचय आणि त्याचे पालन करण्यास शिक्षक मार्गदर्शन आवश्यक आहे.

कृती 2:- संविधानाच्या प्रस्तावनेतील तुला आवडलेले दोन घटक कोणते? आणि का? सांगा.
कृती 3:- खाली संविधानातील प्रस्तावना दिली आहे. ते वाचून पुढे दिलेले प्रश्नांची उत्तरे लिहा.
कृती 4:- राज्यघटनेच्या प्रस्तावनेतील तुमच्या लक्षात आलेले महत्त्वाचे शब्द लिहा.
कृती 5:- प्रस्तावनेत दिलेल्या खालील शब्दाविषयी तू काय अर्थ काढलास ते सांग. 2 ते 5 पर्यंतच्या कृती करण्यासाठी मुलांना मार्गदर्शन करावे आणि संविधानाच्या मुल्यांविषयी जाणीव करुन देणे. त्यांचे पालन करण्यासोबत दैनंदिन जीवनात त्याचा वापर करता आला पाहिजे. हे या कृतीचे मुख्य हेतू असून शिक्षकांनी मार्गदर्शन करावे.

**मूल्यमापन :**

अध्ययन पत्रक चौतीसमधील कृती क्रमांक एक, अध्ययन पत्रक पस्तीस मधील कृती दोन आणि छत्तीसमधील कृती क्रमांक पाच मूल्यमापन कृती म्हणून ग्राह्य धरावे.

# अध्ययन घटक 22 : मूलभूत हक्क आणि कर्तव्य

**अध्ययन निष्पत्ती : दैनंदिन जीवनात मूलभूत हक्कांचा वापर समजून घेणे.**

**उद्दिष्टे :*** मूलभूत हक्काचे महत्त्व समजून घेऊन दुसऱ्याच्या हक्कांचा आदर करणे.

* आपल्या अवती भोवती या हक्कांचे उल्लंघन झाल्यावर न्यायालयाच्या आधारे रक्षण करता येते याचा अर्थ समजून घेणे.

**अध्ययन पत्रक 37 :**

कृती 1:- खाली कोष्टकात काही प्रसंग दिले आहेत त्या प्रसंगांना खालील विधाने कोणत्या मूलभूत हक्कांशी संबंधित आहेत ते चौकटीत लिहा.
कृती 2:-कोणत्या मूलभूत हक्काचे उल्लंघन झाले आहे ते ओळखून लिहा. परिस्थिती समजून घेऊन मूलभूत अधिकारांचे उल्लंघन केले जाऊ शकते आणि उल्लंघन झाल्यास न्यायालयात दाद मागता येते याची जाणीव करुन देणे आणि उल्लंघन केल्यास शिक्षा होऊ शकते हे उदाहरणासहित समजावून देणे. उदाहरणार्थ सरकारी शाळेत कोणत्याही जाती, धर्म, लिंग, या आधारावर प्रवेश नाकारणे. 14 वर्षाच्या आतील मुलांना कामास लावणे हे मूलभूत हक्कांचे उल्लंघन समजले जाते आणि कायद्याने शिक्षा होऊ शकते.
कृती 3:- काही चित्रे दिली आहेत ते चित्र आमच्या कोणत्या हक्क आणि कर्तव्याला संबंधित आहेत यात आपल्याला कोणते पाहिजे, कोणते नको ते प्रत्येक चित्रावर चर्चा करा. हे चित्र हक्क आणि कर्तव्याशी संबंधित आहेत. या चित्रांच्या सहाय्याने समजून घ्या आणि अभिप्राय व्यक्त करा आणि कोणते बरोबर, कोणते चूक ते समजून स्वत:च्या दैनंदिन प्रसंगात कर्तव्याचे पालन आणि मूलभूत हक्कांचे गौरव करुन त्यांचे रक्षण करण्याची जबाबदारी स्वीकारावी.
कृती 4:- खाली काही वाक्ये दिली आहेत, त्याच्यासमोर होय/नाही असे दिले आहे. तुला बरोबर वाटते ते निवडून, का बरोबर ते वर्गात सर्वांबरोबर मिळून चर्चा करा.

कर्तव्यांचे पालन का करावे? संविधान सक्तीचे का केले आहे? हे मुलांनीच अर्थ समजून घेऊन त्याचे पालन करण्यास प्रोत्साहन देऊन प्रत्येकाने आपापल्या कर्तव्याचे पालन केल्यास, राष्ट्राला हे आपले देणे असेल. उदाहरणार्थ - राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत यांचा गौरव करणे, ऐतिहासिक स्मारकांचे रक्षण करणे, राष्ट्रीय संपत्तीची जोपासना करणे.

कृती 5:- कर्तव्याचे पालन नाही केल्यास आपल्याला हक्क विचारण्याचे किंवा हक्क अनुभवता येणार नाही. या विषयावर चर्चा किंवा स्पर्धा आयोजित करणे. यामध्ये सर्वजण भाग घेतील असे प्रयत्न करणे.

वर्गातील मुलांना चर्चा, स्पर्धा आयोजित करुन अभिप्राय मुक्तपणे चर्चा करण्यास संधी देणे आणि मूलभूत हक्क फक्त उपभोगणे एवढेच नसून देशाच्या शांततेसाठी सर्वजण आपापली कर्तव्ये ओळखून त्यांचे पालन करणे किती गरजेचे आहे ही मनोभावना वाढविणे.

कृती 6:- तुमच्या शाळेत आणि गावात तुम्हाला कोणकोणती मूलभूत कर्तव्ये पाळली पाहिजेत त्याची तुमच्या शिक्षकांबरोबर चर्चा करुन यादी तयार करा.

परिसराचे संरक्षण, स्मारकांचे रक्षण, महिलांचा गौरव इत्यादी घटका विषयी चर्चा करुन, आपण राहतो त्या ठिकाणी आपल्या मूलभूत कर्तव्यांचे पालन केले पाहिजे याची मनोभावना वाढली पाहिजे.

**मूल्यमापन :**

अध्ययन पत्रक सदतीसच्या कृती दोन आणि पाच मूल्यमापन कृती म्हणून वापरावे.

# अध्ययन घटक 23 : राज्याची मार्गदर्शक तत्त्वे

**अध्ययन निष्पत्ती : राज्याच्या मार्गदर्शक तत्वाविषयी समजून घेणे.**

**उद्दिष्टे :**सार्वजनिक धोरण आणि कल्याणकारी राज्याच्या स्थापनेसाठी योजनांची अंमलबजावणी करताना, राज्यांची मार्गदर्शक तत्त्वे विचारात घेतली पाहिजेत हे समजून घेणे. त्यांची अंमलबजावणी करणे सक्तीचे नसले तरी वेळ आणि संदर्भानुसार सरकार सार्वजनिक धोरण संचालनालयाकडे जनतेच्या हितासाठी अपील करु शकते याची जाणीव ठेवणे आवश्यक आहे.

**अध्ययन पत्रक 38 :**

कृती 1:- तुमच्या आजूबाजूच्या समाजातील सामाजिक आणि आर्थिक दुर्बल लोकांना बघा, ते दुर्बल राहण्यामागे कारण काय? यावरुन मित्रांबरोबर चर्चा करा.

कृती 2:- राज्यातील मार्गदर्शक तत्त्वे राज्याने पालन करणे सक्तीचे नाही आणि न्यायालयात दाद मागण्यासाठी तक्रार करू शकत नाही.

राज्य मार्गदर्शक तत्त्वे सक्तीने लागू केले पाहिजे का? अथवा नाही, या विषयावर तुमच्या शाळेत चर्चा स्पर्धा आयोजित करावे आणि त्याच्या फायद्या-तोट्या विषयी चर्चा करावी.

कृती 3:- महिला, दुर्बल, ज्येष्ठ नागरिक आणि मुलांसंबंधित कोणतेही पाच राज्य मार्गदर्शक तत्त्वांची यादी करा. वरील तीनही कृतींना शिक्षकांनी मार्गदर्शन करावे.

**मूल्यमापन :**

अध्ययन पत्रक अडतीसच्या कृती दोन आणि पाच मूल्यमापन कृती म्हणून ग्राह्य धरावे.

# अध्ययन घटक 24 : आमची संरक्षण दले

**अध्ययन निष्पत्ती : भारताची संरक्षण दले, भूसेना, नौसेना आणि वायुदल याविषयी समजून घेणे.**

**उद्दिष्टे :**संरक्षण दले देशांमध्ये शांती ठेवण्यासाठी आणि आम्हाला देशांतर्गत आणि बाह्य आक्रमणापासून रक्षण करण्यासाठी महत्त्वाचे आहेत हे समजून घेणे. पुढे सैन्यात भरती होऊन किंवा विविध माध्यमांच्या सहाय्याने सैन्याला मदत करुन सहकार्य करणे.

**अध्ययन पत्रक 39 :**

कृती 1:- देशाला सैनिक का पाहिजेत ? वर्गात शिक्षकांच्या समोर सर्वजण चर्चा करुन, त्याची आवश्यकता समजून घेऊन, प्रसंग सांगून देशाला सैन्याची गरज समजावून देणे. उदा. युध्दाचा प्रसंग

कृती 2:- खालील यादीमध्ये निमलष्करी दल आणि लष्करी दलांची नांवे आहेत. त्यांचे योग्य वर्गीकरण करा.

संरक्षणाची जबाबदारी केवळ भूदल, नौदल आणि हवाई दलात नाही. तर इतर निमलष्करी दले देखील देशाच्या संरक्षणात काम करत आहेत आणि ते एन.सी.सी. आणि रेड क्रॉस सारख्या संस्थाद्वारे सैन्याला मदत करु शकतात.

कृती 3:- एन.सी.सी., रेडक्रॉस, होमगार्ड किंवा तुमच्या गावी कोणीतरी सैनिक असल्यास यापैकी कोणत्याही एका सैनिकाला तुमच्या शाळेत घेऊन जा आणि ते कोणते कार्य करतात, त्यांचा अनुभव मुलांना सांगा.

कृती 4:- तुम्हाला भारतीय संरक्षण दलात सामील व्हायला आवडेल का?

कृती 5:- मुलांना त्यांचे मत मांडण्याची परवानगी दिली पाहिजे. मुलांनी इतर सेवा जसे की, डॉक्टर, इंजिनियर, पोलीस आणि इतर सेवांमध्ये सामील होऊन भारताची सेवा कशी करावी हे समजावून सांगावे.

**मूल्यमापन :** अध्ययन पत्रक 39 मधील कृती 1 आणि 5 मूल्यमापन कृती म्हणून वापरा.

# 28 : समाज विज्ञान शिकण्याच्या सुलभ पध्दती

अध्ययनाचा अर्थ असा नाही की मुले शिक्षकांनी सांगितलेली प्रत्येक गोष्ट शिकत आहेत. अध्ययन म्हणजे मुले क्रियाशील होऊन मग्न होऊन अनुभवाच्या सहाय्याने ज्ञान घेतात. या प्रक्रियेत मुले गटात सहकाऱ्यांसोबत चर्चेत भाग घेऊन अनुभव वाटण्यात व्यस्त आहेत. वैयक्तिक आणि गटात शिकायचे असल्यास शिक्षकांबरोबर आत्मियतेने आत्मविश्वासाने चर्चा केली पाहिजे. खालील पध्दतीमध्ये मुले क्रियाशील होतात.

1) कथाकथन, 2) नियोजन पध्दत, 3) पाठ्यपुस्तक व धड्यांचे पुनरावलोकन, 4) चर्चा पध्दत, 5) समस्या सोडविण्याची पध्दत, 6) नियमित पध्दत, 7) बाल केंद्रित व्याख्यान ( शिक्षक केंद्रित न होता) काळजीपूर्वक वापरावे. 8) युनिट सिस्टम (घटक पध्दत) 9) निरीक्षण पध्दत, 10) सहल पध्दत, 11) पात्राभिनय किंवा नाटकाभिनय पध्दत, 12) क्षेत्र अध्ययन, 13) प्रयोग, 14) क्रिडा

पध्दत, 15) प्रश्नोत्तर पध्दत, 16) संशोधन पध्दत, 17) सर्वेक्षण किंवा मुलाखत, 18) विश्लेषण पध्दत

शिक्षकांनी दैनंदिन अध्ययन घटकाचे स्वरुप समजून, कोणत्या पध्दतीने सुलभपणे गुणात्मक अध्ययन होईल आणि विद्यार्थ्यांना अंगीकार होईल याचा विचार करुन आयोजन केल्यास त्याचे उद्देश पूर्ण होण्यात कोणतीही शंका नाही. असे शिक्षकच उत्तम सामाजिक व्यवस्था निर्माण करतील आणि विद्यार्थ्यांना तयार करतील.

## विविध माहिती तंत्रे व संसाधने

निरंतर अध्ययनशील असणारे मात्र अध्यापक असतात. 'समजलेले हाताच्या पंजा एवढे, समजून घ्यायचे सागराएवढे' अशी म्हण आहे. याप्रमाणे किती शिकेल तेवढे कमीच आहे. शिकण्यासारखे फार आहे. याची जाणीव आम्हाला असली पाहिजे. प्रत्येक गोष्ट मुलांमुळे शिकायला लागते. शोध, स्व-अवलोकन आणि मुलांच्या गरजा यांना संवेदना असल्यास, आपल्या वृत्ती जीवनाचे महत्त्व आणि जबाबदारी नक्कीच वाढेल. परिणामकारी वर्गाचे नियोजन, आकर्षकरित्या अध्ययन, घटकांचे नियोजनासाठी भरपूर साधने तयार करता येतात. दैनिक, साप्ताहिक, मासिक अशा बातमी पत्रातून येणारी माहिती, पाठात पूरक विषयाच्या चित्रांची कात्रणे करुन जपून ठेवल्यास ते उपयोगी साधन ठरु शकतात. तांत्रिक साधन रेडिओ, दूरदर्शन, कॉम्प्युटर, ओ. एच.पी. प्रोजेक्टर, योग्य संदर्भावेळी अध्ययनाला पूर्णपणे वापर करण्याची सवय चांगली असते. शाळा, ग्रंथालयात असणारे अनेक ग्रंथांचे वाचन करावे आणि मुलांना वाचनासाठी संधी प्राप्त करुन द्यावी. काही महत्त्वाचे पूरक ग्रंथ किंवा संदर्भ ग्रंथ - 1) भूगोल भागीदार भाग 1 आणि 2 ते 7 भाग, 2) लहान विश्वकोश, 3) सचित्र इतिहास, 4) प्राचीन भारत, 5) संपूर्ण भारताचा इतिहास, 6) भारताचे संविधान इत्यादी या संदर्भ ग्रंथाचा वापर करुन इतिहास, राज्यशास्त्र, भूगोलाचे प्रयोग, समाजविज्ञानाचे अध्ययन जास्त परिणामकारक करता येईल. कृती एकत्र करणे आणि गट तयार करणे परिणामकारक कार्य अध्ययनाच्या अनुकूलते साठी निरंतर कृती वर्गखोलीत बाहेर कराव्या लागतात. पण कृतीसाठी कृती नाही. वर्गातील एक निरागसता घालवून ज्ञान प्राप्त करण्यासाठी अनुकूल अशी कृती वापरली पाहिजे. उद्देशीत कृतीमुळे अध्ययन मार्ग सोपा होईल असे असावे. आणखीन अपायकारक होण्यासारखे नसावे. अध्ययनाचे अवलोकन कृतीद्वारे निर्णय घेता येईल हे समजून विविध प्रकारच्या कृती एकत्र करुन घेतल्या पाहिजेत. या कृतीला पूर्ण सिध्दता करुन घेतले पाहिजे. कृतींचा भाग म्हणून गट अध्ययनास संधी प्राप्त करुन देणे. विविध गट तयार करताना कोणता विद्यार्थी कोणत्या गटात ठेवावा, कोण अध्ययनास सहकार्य करतो, कोण गटाचा नायक हे मुलांनीच ठरवू द्या. गट अध्ययनाचे ध्येय आणि उद्दिष्ट प्राप्तीसाठी वैयक्तिक लक्ष देणे आवश्यक आहे. प्रत्येक संदर्भात मुलांच्यात सहजप्रवृत्ती म्हणजे कुतुहलाने प्रश्न विचारण्याची मनोभावना, चिकित्सक बुध्दीला प्रेरक ठरेल. कृतीच्या सिध्दतेसाठी जास्तीचे महत्त्व देणे आवश्यक आहे. म्हणून कृती सरळ असूद्या. कृती अध्ययना संबंधित असू द्या. सगळया विद्यार्थ्यांना भाग घेण्यास संधी असावी. विविध भागात विविध नमुन्यांच्या कृती असाव्यात. कृतीनंतर विद्यार्थ्यांचे मत संग्रह करुन अध्ययन अवलोकन करावेत. मागील माहिती प्रत्येक कृतीला आवश्यक असल्यास त्याच्याकडे लक्ष द्या. कृती संग्रह करण्यास काही उदाहरणे - प्रस्तुत शिक्षण व्यवस्थेत विद्यार्थी केंद्रित अध्ययनास जास्त लक्ष दिले

आहे. पाठांतर पध्दतीतून बाहेर येऊन खरोखर अध्ययनास तयार करण्याच्या पध्दती सुरु आहेत. अध्ययनास आवश्यक असणारी कृती अनुकूल करुन घेतली असली तरी त्यांच्या तयारी मागे अनेक अडचणी येतील ते समर्पकपणे सोडविण्यास अनुकूल असणारे अनेक मार्ग, उपाय वापरले पाहिजेत. अशा संदर्भात कृती देण्याच्या सहाय्याने संपूर्ण अध्ययन केले पाहिजे. अध्ययनाच्या वैयक्तिक किंवा सहकारी गटात कृती द्यावी. काही वेळा संपूर्ण वर्गाला कृती दिली पाहिजे.

**1) अध्ययन थांबा कृती :**

समाजविज्ञानात येणारे वंशावळ, दार्शनिक वास्तूशिल्पे, प्रशासनाचे अंग, पृथ्वीचे अच्छादन, वनस्पतीचे प्रकार, प्राणीजग, समाज विज्ञानातील शास्त्रज्ञ अशा कोणत्या तरी एका घटकात असणारे अंश कार्डावर विस्तारपणे लिहावे आणि त्यांच्या जागेवर ठेवावे. मुलांचे चार किंवा पाच गट तयार करुन कार्ड ठेवलेल्या स्थळावर प्रत्येक गटातील विद्यार्थ्यांना नेऊन तेथील विषय वाचून आपापसात चर्चा करावी. नंतर पुढच्या कार्डाकडे जावे. कार्डाचे ठिकाण हाच अध्ययन थांबा होय. कथन पध्दत अनिवार्य वाटणा- यांना सांगण्यासाठी ही पध्दत उपयुक्त आहे .

**2) आमचा गट -परिणिती अध्ययन गट (एक्सपर्ट ग्रूप):**

या गटामध्ये पाच किंवा सहा मुलांचा गट करणे. हा गट आमचा गट आहे. सुरुवातीला कोणतेही काम नाही. शेवटी गटाला एक काम आहे.

दुसऱ्या गटामध्ये एकेकांना क्रमांक देऊन गट तयार करतात. हा एक तज्ञ गट आहे. दिलेल्या विषयावर चर्चा करणारा तज्ञांचा गट. तज्ञ प्रत्येक गटात जातात आणि चर्चा सुलभ करतात. परतल्यावर सदस्य त्यांच्या मूळ गटाकडे परत जातात आणि मुळ गटाशी काय चर्चा केली ते समजून घेतात. मूळ गट सर्व गोष्टी सामायिक करतात. कारण प्रत्येक सदस्य चर्चा करतो तो तज्ञ असतो. शेवटी अधिक तपशिलासाठी शिक्षकांशी संपर्क साधता येईल. व्याख्यान पध्दत अपरिहार्य आहे असे वाटणाऱ्याना सांगण्यासाठी ही पध्दत आहे.

**3) सहकार कृती:**

दोन सहकाऱ्यामध्ये समाजविज्ञानात येणारी वंशावळी, वास्तुशिल्पे, प्रशासनाचे घटक, भू-आवरण, वनस्पती वर्ग, प्राणी यांची नांवे चिठ्ठीत लिहून त्याची निवड करण्यास सांगणे. तसेच सहकाऱ्याना त्या गटात जाण्यास सांगणे, तेथे त्यांच्या विषयी चर्चा करावी.

**4) गट कृती:**

गट चर्चेमध्ये दोन विद्यार्थ्यांचे गट किंवा तीन विद्यार्थ्यांचे गट असे जास्तीत जास्त दहा विद्यार्थ्यांचे गट एकत्र करावेत. या गटांना समाजविज्ञान पाठ्यपुस्तकात येणारे राजा-राणी, सत्ताधीश असणारी नांवे, स्थळ, नदी, राष्ट्रीय नेते, देश किंवा राजधानी ग्रह- तारे गट अशीच नांवे दिली पाहिजेत.

विद्यार्थी गटांत विभागून अध्ययन अंशाला योग्य असणाऱ्या कृतींचे आयोजन करणे. प्रत्येक गटाला ही जबाबदारी द्यावी. प्रत्येक गटातील चर्चेमध्ये मुलांचा सहभाग पाहणे, आवश्यक आहे तेथे मार्गदर्शन करावे, गटामध्ये मुलांचा सहभाग, तेथे निर्माण होणारे गोंधळ, अस्पष्टता, गरज, सूचना, सल्ले देत परस्पर अध्ययनास संधी देणे, प्रस्तुत समाज विज्ञान पाठ्यपुस्तकात या प्रकारची गट चर्चा आणि माहिती संग्रह कृती असून, मुलांच्या अध्ययनाचा खजिना भरण्यास आणि त्यांच्या पूर्व ज्ञानाबरोबर स्वत: ज्ञान घेण्याची संधी आहे.

उदा.

1) मंदिर मस्जीद किंवा स्मारकांना भेटी देऊन तेथील वैशिष्ट्ये नोंद करण्याची कृती. ग्रामपंचायत किंवा कोणत्याही केंद्रास भेट द्या. तेथे चालणाऱ्या सभा किंवा इतर प्रकिया समजून नोंद ठेवण्याची कृती.

2) विविध चिन्हे, प्राणी वर्ग, वनस्पती, पक्षी, नाणी, झेंडे, चित्रे संग्रह करण्याची कृती.

3) एका कृतीत 'कार्यरत नमूना' निरीक्षण करत, तेथे चर्चा करुन निर्णय घेण्याची संधी आहे.

वरील संदर्भात मुलांचे बोलण्याचे कौशल्य, सहभागीत्व, परस्पर विनिमय, दाखली करण मुख्य असते. आपल्याला समजलेल्या ज्ञानाच्या सहाय्याने नवीन प्रसंगात ज्ञानाची पुन्हा रचना करण्यास साध्य होईल. याच्या सहाय्याने स्वत: ज्ञान मिळविण्यास साध्य होते. प्रत्येक संदर्भात मुलाला अभिप्राय देणे अथवा ती देण्यासाठी संधी असते.